दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.


बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे अंक –१९२ मंगळवार,दि.१८ मार्च २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-192 Tuesday, Dt.18 March 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# नागपूरमध्ये दगडफेक, परिसरात तणावाचं वातावरण!

**प्रतिनिधी** । नागपुर

नागपूरमध्ये दगडफेकीची घटना घडली आहे. या घटनेमुळे सध्या नागपुरात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. विशेष म्हणजे या दगडफेकीमुळे नागपुरातील शिवाजी चौकाला छावणीचं स्वरुप आलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार जमावाने काही गाड्यांना आगदेखील लावली आहे. पोलीस जमावाला पांगवण्याचा प्रयत्न करत आहेत. सोबतच जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांकडून अश्रूधुराचा वापर केला जात आहे. पोलिसांनी ठिकठिकाणी बॅरिकेड्स लावले आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून कसोशीने प्रयत्न केले जात आहेत.



### क्रेनला आग, दगडफेक

मिळालेल्या माहितीनुसार जमावाने एका क्रेनलाही आग लावली आहे. पोलिसांच्या दिशेने दगड आणि विटांचा भिरकावल्या जात आहेत. मात्र पोलीस जमावावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.


### दगडफेकीमुळे गाड्यांचेही नुकसान

मात्र चिटणीस पार्कच्या पलीकडे भालदारपुरा परिसरातून मोठ्या प्रमाणावर पोलिसांवर दगडफेक सुरु झाली. पोलिसांनी बळाचा वापर करून स्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र मोठ्या आकाराचे दगड पोलिसांच्या दिशेने भिरकावले जात असल्यामुळे पोलिसांकडून अश्रूधुराच्या नळकांड्या वापरून जमावाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. दगडफेकीमध्ये काही गाड्यांचे नुकसानही झाल्याची माहिती आहे.

### नेमकं काय घडलं?

मिळालेल्या माहितीनुसार संध्याकाळी सात ते साडेसातच्या दरम्यान मोठ्या संख्येने एक गट शिवाजी चौकाच्या जवळ पोहोचला होता. या गटाने घोषणाबाजीला सुरुवात केली. दुपारी झालेल्या विश्व हिंदू परिषदेच्या आंदोलनासंदर्भात त्यांचा रोष होता. घोषणाबाजी सुरू होताच परिसरातील दुसऱ्या गटानेही घोषणाबाजी सुरू केली. त्यानंतर पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घोषणाबाजी करणाऱ्या दोन्ही गटांना वेगवेगळे केलं. त्यानंतर पोलिसांनी सर्वांना शिवाजी चौकावरून चिटणीस पार्कच्या दिशेने मागे ढकलले.

## Short NEWS



## पवार कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर

### भारती पवार यांचं निधन; काकीच्या आठवणीने सुप्रिया सुळें गहिवरल्या

**प्रतिनिधी** । पुणे

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या भाऊजाय भारती प्रतापराव पवार (वय ७७ वर्षे) यांचे सोमवारी सायंकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्यामागे मुलगा 'सकाळ'चे व्यवस्थापकीय संचालक अभिजित पवार, सून मृणाल, नातवंडे जान्हवी आणि राहुल तसेच मुलगी अश्विनी, नातू झाकीर असा परिवार आहे. भारती पवार यांच्या पार्थिवावर मंगळवारी (ता. १८) दुपारी १२ वाजता पुण्यात अंत्यसंस्कार होणार आहेत. भारती पवार यांच्या निधनाने पवार कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी या निधनाची माहिती देत शोक व्यक्त केला आहे.

भारती पवार या गेल्या सहा महिन्यांपासून आजारी होत्या. त्या पूर्वाश्रमीच्या भारती श्रीपतराव पाटील होत. मूळच्या मुंबईतील असलेल्या भारती यांचे


(उर्वरीत पान २ वर)

## मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

### कुणाल दत्ता, अरुणा म्हारोळकर यांना पेटंट

**प्रतिनिधी** । छत्रपती संभाजीनगर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील दीनदयाळ उपाध्याय कौशल केंद्राचे डॉ. कुणाल दत्ता आणि जालना येथील जेईएस महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. अरुणा म्हारोळकर यांना स्मार्ट लॅबोरेटरी ग्लास वेअर वॉशर अँड ड्रायर या संशोधनासाठी इंडियन पेटंट ऑफिस यांनी पेटंट बहाल केले आहे.



डॉ. दत्ता आणि म्हारोळकर यांनी तयार केलेल्या या यंत्राद्वारे अतिशय प्रयोगशाळेतील काचेच्या वस्तू सहज स्वच्छ करणे, त्या वाळवणे शक्य होणार आहे. विशेष म्हणजे डॉ. म्हारोळकर या जालन्याच्या आहेत. त्यांच्या या यशामुळे मराठवाड्याच्या बुद्धिमत्तेचा डंका पुन्हा सर्वत्र दुमदुमला आहे.

संशोधकांबद्दल थोडेसे

डॉ. कुणाल पी. दत्ता हे दीनदयाळ उपाध्याय कौशल केंद्रातील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि सहायक प्राध्यापक आहेत. ते भौतिकशास्त्र, ऑटोमेशन आणि इलेक्ट्रॉनिक, मेकॅनिकल सिस्टीममध्ये विशेषज्ञ म्हणून ओळखले जातात. तर डॉ. अरुणा म्हारोळकर या

(उर्वरीत पान २ वर)

## बीड जिल्ह्यात सुसज्ज विमानतळ उभारणार

### उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची विधिमंडळात घोषणा

**प्रतिनिधी** । बीड

बीड जिल्ह्यात विमानतळ उभारून जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधींनी केली असून याबाबतचा प्रस्ताव बीड जिल्हा प्रशासनाने संबंधित यंत्रणांना सादर केलेला आहे. बीड जिल्ह्यात सुसज्ज असे विमानतळ उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, या कामाला आता गती देण्यात येणार असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी आज विधिमंडळात घोषित केले.

बीड जिल्हा प्रशासनाने मागील काळात याबाबतचा प्रस्ताव केंद्र व राज्य शासनास संबंधित यंत्रणांकडे सादर केलेला असून, किमान तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारण्याच्या दृष्टीने सुसज्ज जागा, केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून भूसंपादन इत्यादी प्रक्रिया गतीने पूर्ण करून, विमानतळ उभारणीचे काम वेगाने केले जाईल असेही अजित दादा पवार आपल्या भाषणात पुढे बोलताना म्हणाले.

बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी या घोषणेचे स्वागत केले असून, बीड जिल्हावासियांचे रेल्वे पाठोपाठ आता सुसज्ज अशा विमानतळाचेही स्वप्न पूर्ण होणार असल्याचा आपल्याला मनापासून आनंद आहे. हा निर्णय म्हणजे केवळ बीड साठीच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यासाठी मोठी उपलब्धी असून, बीड जिल्ह्याच्या औद्योगिक, कृषी आणि व्यावसायिक प्रगतीसाठी हा महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरणार आहे, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. धनंजय मुंडे


(उर्वरीत पान २ वर)

## बीड शिक्षक आत्महत्या प्रकरणाचा अधिवेशनात मुद्दा

### संस्थाचालकावर गुन्हा दाखल होणार, अंबादास दानवेंच्या प्रश्नाला गृह राज्यमंत्र्यांचे उत्तर

**प्रतिनिधी** । बीड

विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्याच दिवशी बीड येथील शिक्षकाच्या आत्महत्येचा मुद्दा सभागृहात गाजला. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बीडमधील शिक्षकाच्या आत्महत्याप्रकरणावरुन सरकारला सवाल उपस्थित केले. तसेच संबंधित संस्थाचालकांवर गुन्हा का दाखल झाला नाही, असा जाब विचारला. ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनीही हा मुद्दा उपस्थित करत संस्थाचालकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यावर



सखोल चौकशी करुन गुन्हा दाखल होईल, असं उत्तर गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिले.

केज तालुक्यातील केळगाव येथील आश्रमशाळेवर १८ वर्षांपासून विनावेतन नोकरी करणाऱ्या शिक्षकाने शनिवारी पहाटे बीड

(उर्वरीत पान २ वर)

## पोलिसांनी सील केलेल्या कुटे ग्रुपचे भंगार साहित्य भरदिवसा गेले चोरीला?

**प्रतिनिधी** । बीड

ज्ञानराधा मल्टिस्टेमध्ये हजारो ठेवीदारांचे कोट्यावधी रुपये अडकल्यानंतर संचालक सुरेश कुटे यांना पोलिसांनी अटक करून त्याच्या द गुटे ग्रुपसह तिरुमला ऑइल मिलला सील ठोकले आहे. मात्र तरी देखील येथील मोठमोठ्या मशीन रातोरात गायब होत आहेत. आता पिंपळनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कुटे ग्रुपच्या ऑइल मिलमधून भंगार साहित्य भर दिवसा चोरीला जात आहे. याकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे. सुरेश कुटे याने महाराष्ट्रातील हजारो ठेवीदारांना कोट्यावधी रुपयाचा गंडा घातला आहे. सर्वांचे पैसे देणार असल्याचा दावा करत सुरेश कुटे बँक बंद पडल्यानंतर ९ महिने फरार होता. मात्र पैसे मिळत नसल्याने ठेवीदारांनी गुन्हे दाखल केल्यानंतर



पोलिसांनी त्याला अटक केली. त्यानंतर सर्व कार्यालय सील केले.

पिंपळनेर पोलिस ठाण्याचे ठाणे प्रमुख मधुसूदन घुगे म्हणाले की, सुरेश कुटे यांच्या वडिलांची पुण्यतिथी जवळ आल्याने त्यांचे बंधू सदाशिव कुटे यांनी तेथे साफसफाई केली आहे. भंगार चोरीचा प्रकार घडलेला नाही.

## अजित पवारांच्या नावाने धनंजय मुंडेंकडेच बीडचे पालकत्व:तृप्ती देसाई यांचा आरोप

### वाल्मीक कराडला पाठिशी घालणाऱ्यांचे पुरावे दिले

**प्रतिनिधी** । बीड

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने धनंजय मुंडे हेच बीडचे पालकत्व सांभाळत असल्याचा संशय सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी व्यक्त केला आहे. बीडमध्ये दररोज एकाहून एक भयंकर घटना उजेडात येत आहेत. पण अजित पवार कुठेच दिसत नाहीत. ते त्यावर काही बोलतही नाहीत. त्यामुळे अजित पवार पालकमंत्रिपद चालवत आहेत की, त्यांच्या नावाने धनंजय मुंडे हेच कारभार पाहत आहेत हे कळत नाही, असे त्या म्हणाल्यात.

तृप्ती देसाई यांनी काही




दिवसांपूर्वी बीडच्या अनेक पोलिस अधिकाऱ्यांचे संतोष देशमुख हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराडशी हितसंबंध असल्याचा आरोप केला होता. त्यांच्या या आरोपांनंतर बीड पोलिस दलात एकच खळबळ माजली होती. त्यानंतर बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या निर्देशांनुसार, पोलिसांनी तृप्ती देसाई यांना आपल्या आरोपाचे पुरावे सादर करण्यासाठी नोटीस बजावली होती. त्यानुसार तृप्ती देसाई यांनी सोमवारी बीड दौऱ्यावर जाऊन पोलिसांना आपल्या आरोपांची पुष्टी करणाऱ्या पुराव्यांचा पेनड्राईव्ह सुपूर्द केला.

२६ पोलिसांविरोधात पेनड्राईव्हद्वारे पुरावे दिले

यासंबंधीच्या माहितीनुसार, तृप्ती देसाई सोमवारी सकाळी ११.३० वा. बीड पोलिस अधीक्षक कार्यालयात हजर झाल्या. त्यानंतर बीडचे अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांनी त्यांचा जबाब नोंदवला. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना तृप्ती देसाई

(उर्वरीत पान २ वर)

## पाषाण -दगडातूनच संस्कृती टिकून: दैठणकर

### सर्वेश्वर गणेश मंदिरात छायाचित्रांचे प्रदर्शन सुरू




**प्रतिनिधी** । बीड

प्रत्येक मंदिराची स्वतंत्र राशी कथा आणि आख्यायिका असून या मंदिराच्या माध्यमातून पाषाण आणि दगडातून आपली संस्कृती टिकून ठेवली आहे असे प्रतिपादन बीड जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांनी केले. राष्ट्रसंवर्धन संस्था इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र प्रांत आणि मंदिर कोश प्रकाशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने येथील सर्वेश्वर गणेश मंदिरात गाणारे दगड बोलणारे पाषाण या मंदिरांच्या छायाचित्रांचे अभूतपूर्व प्रदर्शन सोमवार दिनांक १७ मार्च रोजी सकाळी सुरू करण्यात आली या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी श्रीदैठणकर बोलत होते प्रमुख पाहुणे म्हणून रास व संघाचे नगर संघ चालक डॉक्टर अनिल बारकूल, विश्वस्त मंडळाचे गणेश बलदवा, दैनिक लोकप्रश्न चे संपादक दिलीप खिस्ती, पत्रकार वैभव

(उर्वरीत पान २ वर)

### हेबाळकर यांचे आज व्याख्यान...

या प्रदर्शनाअंतर्गत मंगळवार (दि. १८) रोजी सायंकाळी सहा वाजता अंबाजोगाई येथील इतिहास संशोधक डॉ. शरदराव हेबाळकर यांचे 'भारतीय संस्कृतीचा विश्वसंचार 'या विषयावर व्याख्यान होणार आहे अध्यक्षस्थानी विठ्ठल मंदिर संस्थान पेठ बीड चे एकनाथ महाराज पुजारी हे राहतील.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# गुंतवणुकीचा पहाटवारा

कोकणातील पाच जिल्ह्यांमध्ये ८००० कोटी रुपयांच्या प्रकल्पांची घोषणा, ३३१ उद्योजकांचे करार आणि ७२ हजार रोजगार निर्मितीची आशा आहे. ऊर्जा, औषधनिर्माण, रसायने, अभियांत्रिकी आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये गुंतवणूक प्रस्ताव आहेत. ठाण्यासह, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये नवीन उद्योगसंस्थांची उभारणी होईल. औद्योगिक विकासासाठी कोकणवासीयांना मोठे उपाययोजना गरजेच्या आहेत.

काही काळापूर्वी झालेल्या अतिविशाल प्रकल्पांच्या घोषणांपाठोपाठ कोकणातील पाच जिल्ह्यांमध्ये आठ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार, ही होळीनिमित्त कोकणवासीयांना मिळालेली भेटच म्हणावी लागेल. ठाण्यात झालेल्या कोकण विभागीय गुंतवणूक परिषदेत वेगवेगळ्या क्षेत्रांमधील ३३१ उद्योजकांनी उद्योगांच्या स्थापनेबाबत सरकारशी करार केले असून, त्यातून सुमारे ७२ हजार नव्या रोजगारांची निर्मिती होण्याची आशा आहे. त्यामध्ये ऊर्जा, औषधनिर्माण, निर्यात, रसायने, अभियांत्रिकी, कपडे उत्पादनापासून माहिती तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्र असे वैविध्य आहे. काही काळापूर्वीच 'वेल्लोर इन्फोटेक' किंवा 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर'ने उद्योग स्थापनेबाबत दाखविलेला रस, त्यातून येऊ घातलेला अतिविशाल दारूगोळा निर्मिती प्रकल्प यापाठोपाठ नव्याने झालेल्या या करारांमुळे कोकणात उद्योगसंस्कृती उभी राहण्याची आशा निर्माण झाली आहे. यामध्ये औद्योगिकदृष्ट्या आघाडी घेतलेल्या ठाण्यामध्ये सर्वाधिक म्हणजे पावणेपाच हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येणे साहजिक आहे. त्यापाठोपाठ पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतही प्रकल्प सुरू करण्याबाबत उद्योजकांनी कमीअधिक प्रमाणात रस दाखविला आहे. उद्योगांबाबत कागदावर झालेला करार प्रत्यक्षात आणण्याचे आव्हान आता सरकारपुढे असेल.

उद्योगांच्या स्थापनेमध्ये महाराष्ट्राने स्थापनेपासूनच देशात आघाडी घेतली होती; पण आता उद्योग आणि आर्थिक प्रगतीचे सर्वच राज्यांना भान आले असून, त्यातून राज्यापुढे मोठी स्पर्धा उभी राहिली आहे. प्रामुख्याने मुंबई, पुणे व नाशिक या त्रिकोणात महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगती वाढली आणि विकासाचे एक असंतुलन निर्माण झाले. त्यानंतर विदर्भ-मराठवाड्यातही उद्योग नेण्याचे प्रयत्न सुरू झाले. या स्पर्धेत कोकण मात्र मागे पडला. याला अनेक कारणे आहेत. माजी मुख्यमंत्री बॅ. अ. र. अंतुले यांनी पुढाकार घेऊन रायगड व परिसरात काही मोठे कारखाने आणले. नंतर मात्र कोकणच्या औद्योगिक विकासाच्या गाडीने अपेक्षित वेग घेतला नाही. वीज, पाणीपुरवठा, रस्ते आणि बँकिंगसारख्या सुविधा आदींचा अभाव हे त्यामागील प्रमुख कारण. देशातील महत्त्वाचा महामार्ग असलेल्या मुंबई-गोवा रस्त्याच्या दुरवस्थेचे दुष्टचक्र थांबलेले नाही.

### जाहीर प्रगटन

**मा. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अंबड, जि. जालना**
**यांचे न्यायालयात**
**(श्रीमती एस एस जैन यांचे समक्ष )**
**निशाणी क्र.**
**किरकोळ दिवाणी अर्थ नं: - ३९/२०२५**
**बायनाबाई व इतर व निरंक**

अर्जदार
१) बायनाबाई तात्याबा बाबर, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम.
२) भगवान तात्याचा बाबर, वय ६० वर्ष, धंदा-मजुरी.
३) नारायन तात्याबा बाबर, वय ५८ वर्षे, धंदा- मजुरी.
४) जालिंदर तात्याबा बाबर, वय ४०, धंदा - शेती,
सर्व रा. अंबड, ता- अंबड, जि. जालना.
विरुद्ध
गैरअर्जदार :- निरंक,
विषय:- मुंबई रेग्युलेशन ॲक्ट म २ व. ७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की ज्याअर्थी अर्जदार यांनी विधीज्ञ श्री. केएन शर्मा, यांचे मार्फत सदरचा अर्ज मुंबई रेग्युलेशन कायदा कलम २ व ७ प्रमाणे अर्जदारास वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला असून सदरील अर्जनुसार अर्जदार हे वरील ठिकाणी राहणारे आहेत तसेच मयत तात्याबा गंगाराम बाबर यांचे अर्जदार क्र १ ह्या मयताच्या पत्नी आहेत व अर्जदार क्र २ ते ४ हे मुले आहे. मयत तात्याबा गंगाराम बाबर हे दिनांक-०७/१०/२०२१ रोजी मयत झाले आहेत. तसेच, अर्जदार हे मयताचे कायदेशीर मुळ वारस आहे. अर्जदाराशिवाय अन्य इतर कोणीही वारस नाही. मयत तात्याचा गंगाराम बावर यांच्या नंतर शासकीय व निमशासकीय कामासाठी तसेच वीज जोडणी नळ जोडणी सार्वजनीक बांधकाम उपविभाग कार्याल, तहसील कार्यालय, नगर परिषद, ग्रामपंचायत कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय अश्या सरकारी कार्यालयातील नोंदी या वारसाने अर्जदाराच्या नावे करणे असल्याने मयत याचे वारस असल्याबाबतच्या प्रमाणाची आवश्यकता आहे. करिता अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनावारे आम जनतेस कळविण्यात येते की, जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात स्वतः किंवा वकिलामार्फत आपला आक्षेप असल्यास सदर आक्षेप नोंदवावा, मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व कोणाचाही काही आक्षेप नाही म्हणून अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्राचा निकाल देण्यात येईल.

दिनांक १०/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**स्वाक्षरित/-**
**(एस टी पवार)**
**विभाग लिपिक**

**शिक्का**

**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**व स्तर अंबड**
**जिल्हा जालना**

# आयुष्यभर राजकारणासोबत राहून समाजकारण करणारा लढवय्या नेता म्हणजे अरुणभाऊ उपाध्ये


## तरीही स्वपक्षातील स्थानिक नेत्याकडून कायम दुर्लक्षित ?

फारूख शेख । अंबड

राजकारण व समाजकारणात गेल्या पंचावन्न वर्षांपासून अरुण भाऊ उपाध्ये सक्रियपणे व प्रामाणिकपणे काम करीत आहे.१९७३ ला जनसंघाचा पुर्णवेळ कार्यकर्ता म्हणून धुळे जिल्हयाची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आली.ती जबाबदारी त्यांनी यशस्वी पार पाडली. भारतीय जनता पार्टीच्या उभारणीसाठी त्यांनी प्रसंगी जेल भोगले पण मागे हाटले नाहीत. भाऊकडे गेलेला कोणताही व्यक्ती कधीही निराश होत नाही हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. सामान्य गोरगरीब जनतेचे कैवारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. सत्ता असो अथवा नसो भारतीय जनता पक्षाशी कायम निष्ठा ठेवून प्रामाणिकपणे झटणारे सामान्य कार्यकर्ते म्हणून त्यांच्याकडे अंबड तालुकाच नव्हे तर जालना जिल्हा पाहतो.मात्र दुर्दैवाने पक्षाने त्यांना निष्ठेचे फळ म्हणून जी राजकीय संधी देणे अपेक्षित होते ती संधी त्यांना मिळाली नाही. भविष्यात पक्षांतर्गत विषय बाजूला ठेवून पक्षाने, पक्षाच्या नेतृत्वाने अशा नेतृत्वाला राजकीय उभारी देणे गरजेचे आहे. इतकेच.

भाऊंच्या राजकीय जीवनपटाकडे मागे वळून पाहिले असता, त्यांनी त्या काळात दोन वेळा दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा भोगली. त्या शिक्षेतून मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. सन १९७५ साली या देशाची लोकाशाही संकटात आली. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या देशावर आणीबाणी लावली. या विरुद्ध त्यांनी सत्याग्रह केला. त्यासाठी त्यांना पंधरा दिवसाची शिक्षा भोगावी लागली. त्यानंतर मिसा नावाच्या कायद्याखाली नाशिक येथील मध्यवर्ती कारागृहात दीड वर्षांचा तुरुंगवास त्यांनी भोगला. त्यानंतर सन १९८० च्या कालखंडाच्या दरम्यान छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्हयातून दोन वर्षे हद्द पार करण्यात आले. या हद्दपारीची शिक्षा पुढे मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केली.

त्यानंतर गेले चार टर्म पासून अंबड नगर परिषदेत नगरसेवक म्हणून कार्यरत आहेत. सन २०१२ साली भयंकर दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली असता त्यात अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत अंबड तालुक्यातील मौजे दहिपुरी येथे मुक्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता त्यावेळी मित्र विवेकजी देशपांडे यांच्या अर्थ सहाय्याने बोर घेऊन जनावरांना पाणी पिण्यासाठी मोठा हौद बांधून मुक्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. दहा हजार कडब्याच्या पेंढ्या जनावरांसाठी तत्कालीन जिल्हाधिकारी मा. शाम देशपांडे यांच्या हस्ते वाटप केल्या. मुक्या जनावरांविषयी असणारी तळमळ त्यातून त्यांची दिसून आली. पानेगाव येथे नाला खोलीकरण व जनावरांसाठी पाण्याची व्यवस्था आणि दहा हजार पेंढ्या मा.आमदार संतोष भाऊ दानवे यांच्या हस्ते वाटप करण्यात आल्या. पाचशे लिटरच्या पाण्याच्या पन्नास टाक्या मा.किरीटजी सोमय्या यांच्या संस्थेकडून मिळाल्या आणि त्या टाक्या चिंचखेड येथे किरीटजी सोमय्या यांच्या हस्ते वाटप करण्यात आल्या. मौजे कासारवाडी येथील साठवण तलावाचे शेतकऱ्यांचे दहा वर्षांपासून शासन दरबारी रखडलेले पैसे मा.खासदार रावसाहेब पाटील दानवे यांच्याकडे या शेतकऱ्यांच्या पैशाचा प्रश्न मांडून त्यांच्याकडून शेतकऱ्यांचा रखडलेल्या पैशाचा प्रश्न मार्गी लावून मा.खासदार रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते शेतकऱ्याला चेक वाटप करुन न्याय देण्याचा प्रयत्न केला.अंबड येथील शेकडो शेतकऱ्यांना पीककर्ज आंदोलन करुन त्यांना पिक कर्ज मिळून दिले.



राष्ट्रास्तव जे झिझले कणाकण तेच खरोखर विजयी जीवन...

सन २०१२ पासून २०१४ पर्यंत पारनेर व ताडहादगांव जि.प.सर्कल मधील सुमारे पन्नास गावात भारतीय जनता पार्टी (भाजपा) च्या शाखा उभारुन पक्ष वाढीसाठी नवीन कार्यकर्त्यांची फौज उभा केली. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा गुजरात मध्ये उभारणी करण्यासाठी पक्षाने ग्रामीण भागातून लोक संकलन करण्याचा कार्यक्रम हाती घेतला होता. पंधरा दिवस ग्रामीण भागात मुक्कामी राहून लोक संकलन केले. मा.पंतप्रधान मोदीजी यांची पहिली सभा मुंबई येथे झाली.त्या सभेला अंबड तालुक्यातून पाचशे कार्यकर्ते मुंबईला ते घेऊन गेले होते.असे शेकडो कामे आजपर्यंत करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. गेल्या दोन वर्षे पासून १९९३ ते २००० या कालावधीत रोजंदारीवर काम करणारे अंबड नगर परिषद मधील सफाई कामगारांना सेवेत कायम करण्यासाठी प्रयत्नशील आहे. तसेच अंबड येथील भिल समाजाच्या लोकांना घर व जागा नसल्याने भिल समाजाचे लोक शासकीय जमीनीवर वीस वर्षांपासून अतिक्रमण करून तात्पुरते पत्राचे झोपड्या व खोप्या टाकून राहात होते. त्यांच्यासाठी २०११ च्या शासनाच्या जीआर च्या अनुषंगाने सदर जमीनीवर प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत या आदिवासी लोकांना एक हजार स्केअर फूट जागा नावावर करून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर बांधून देण्याचा शासन निर्णय आहे.अंबड शहरातील भिल समाजाच्या लोकांना घर व जागा मिळावी आणि त्या लोकांना घर बांधण्यासाठी घरकुलाचा लाभ मिळावा या दृष्टीने महसूल मंत्री मा.ना.श्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन त्यांचे जिल्हाधिकारी जालना यांच्या नावे कारवाही करण्याचे आदेश आणले.अंबड नगर परिषदेने या संदर्भात कार्यवाही सुरु केली शासन निर्णया प्रमाणे अरुण भाऊ उपाध्ये यांच्या प्रयत्नामुळे भिल लोकांना जागा व घर मिळाले.

त्यांच्याबद्दल असे म्हणावे लागेल, आपने लिये तो बहोत सारे लोग जिते है,कभी औरो के लिये भी जिके देखो वह जिनेवाले का नाम है अरुण भाऊ उपाध्ये. ग्रामीण भागातल्या एखाद्या शेतकऱ्याने जर चार चाकी गाडी घेतली तर तो गाडीच्या पाठीमागे आई-वडीलांची पुण्याई असे लिहितो पण आता पक्ष भाजपाकडून एकच आपेक्षा आहे ज्यांनी पक्ष जिवंत ठेवला ज्या पक्षाचे महाराष्ट्र राज्यात दोनच आमदार होते तरी ही हिंमत न हरता त्यांनी पक्षाचे काम एकनिष्ठने केले.म्हणून ते आज पक्षाला वडीलासमान आहेत.खेडेगावातील व अंबड शहरातील गोरगरीब लोकांचे कोणतेही काम असेल तर ते त्या व्यक्तीचे कामे त्यांच्यासोबत जाऊन करुन देतात भाऊ विषयी जनसामान्यात आपुलकीची भावना निर्माण झालेली आहे. त्यांच्याकडे काम घेऊन जाणारा माणूस भाऊ काम करणारच आहे या उद्देशाने जात असून खरोखर त्याचे काम भाऊ करुन देतात. त्यांच्याभोवती लोकांचा नेहमीच घराडा असतो. आजारी असतानाही आपल्या जिवाची पर्वा न करता लोकांच्या कामाचा विचार करणारा गोरगरीबांचा कैवारी माणूस म्हणजेच अरुण भाऊ उपाध्ये. राजकारणात राहून समाजकारणावर भर देणारा एक लढवय्या नेता म्हणून त्यांची ओळख आहे.

# परंपरा दिडसे वर्षाची !

## दहावी पिढी देखील जतन करतेय देविच्या सोंगाचे पौराणीक वैभव !भारतकुमार पानसंबळ

प्रतिनिधी । शिरूर कासार

शिरूर : येथील कासार समाजाचे कुलदैवत तथा ग्रामदैवत जाज्वल्य शक्तिपीठ म्हणून कालिका देवी श्रध्दास्थान असुन या देवीचे सोंग व्याघ्रसवारी हातात तलवार ढाल असे अष्टभुजा सोंग होळीच्या दिवशी काढण्याची जवळपास दिडसे वर्षाची परंपरा आजही दहावी पिढी हे अध्यात्मिक व पौराणीक वैभव जतन करतेय .

वर्षातून दोन वेळा हे देवीचे सोंग हे माजी सैनिक अशोक गिरी यांच्या निवासस्थानापासुन गांधी चौकात एका विशिष्ट वाद्याच्या तालावर जाते ,हजारो भाविक आवर्जून हे पहाण्यासाठी गर्दि करत असतात ,गुरूवारी सायंकाळी आठ वाजता हे सोंग काढण्यात आले होते .शिंदूर चर्पित ,डोक्यावर मुगुट ,हिरवे पातळ ,अष्ट भुजा ,एका हाती तलवार तर दुस-या हाती ढाल ,वाघावर बसुन निघालेले हे सोंग सर्वांचे आकर्षण असते .सोंगाचे मुख्य पात्र दिवसभर उपवास करते ,पायात पादत्राणे घालत नाही .जवळपास पन्नास साठ मदतनिसांची दिवसभर धावपळ असते ,सोंग सजवण्यासाठी लागणारे साहित्य संकलीत केले जाते . बोल भवानी की जय असा जयघोष करत सोंग बाहेर आणले जाते .

नवू पिढ्या दिवंगत झाल्या !

सोंगाची मुख्य भुमिका बजावणा-या नवू पिढ्या दिवंगत झाल्या त्यात विश्वनाथ पाटील ,विठोबा घोरपडे ,काळुराम गिरी ,राजधर हरिदास ,आण्णाबुवा हरिदास ,विश्वनाथ झीरपे ,भगवान भांडेकर ,दशरथ तळेकर यांचेनंतर आता बबन भांडेकर हे सोंग परंपरा सांभाळतात .

अनेक सहकलाकार आज हयात नसले तरी त्यांचे आवर्जून स्मरण झालेशिवाय राहत नाही त्यात मुख्यत्वे भाऊ सुतार ,मारूती माळी ,किसन तुटके गाडेकर ,मोहन माळी ,राणू बोटे ,एकनाथ सुतार ,आश्राजी गायकवाड ,गणपत पवार ,दगडू शिंगाडे ,जाणूभाई ताशावाले ,पत्रकार अशोक भांडेकर , भारत गाडेकर यांचा समावेश आहेत .

आपल्या पुर्वजांची ही परंपरा त्यांचे स्मरण म्हणून आता दत्तू माळी , दादा हरिदास ,देवीदास पाटील ,विष्णू देशमुख ,लक्ष्मण थोरात ,भाऊ तळेकर ,शिवा गाडेकर ,आसाराम गाडेकर ,बबन माळी ,विनोद गाडेकर ,ज्ञानोबा तळेकर ,रामु सुतार ,शरद गाडेकर यांचे योगदान असते .



### सोंगाचा शृंगार चढवला की चैतन्य स्फुरते !

वय ७३ वर्ष झाले ,शरीर थकले तरी देखील देवीच्या सोंगाचा शृंगार आणि आभुषणे परिधान केले की एक चैतन्य स्फुरते आणि दोन तास आपल्याकडून ही सेवा कालिका देवी करून घेते असे बबन भांडेकर यांनी सांगितले .

### पारंपारीक नृत्य आणि वाद्य !

मुख्य सोंगाचे पुढे असते वाघ्या ,मुरळी ,भुत्ते आणि तालबध्द वाद्य सूर ज्ञानोबा चांदणे , सनयी दशरथ चांदणे ,शिंगाडे बापू सोनवने ताशा रब्बानी यांचा सहभाग असतो वाद्याचा हा विशिष्ट ताल बहुधा फक्त शिरूरला आणि तो देखील सोंगापुढे ऐकायला मिळतो .

सोंगापुढे दिवट्या ,काकड्याचा प्रकाश आणि राळ उडवण्याचे कसब महादेव वाघमारे यांचे पहायला मिळते .अत्याधूनिक युगात देखील सोंगाचे आकर्षण कायम !टि व्ही ,सिनेमा ,नाटक अशा अत्याधुनिक करमणूकिच्या यूगातही हे सोंगाचे आकर्षण कायम असुन हजारो भाविक दृष्टीदर्शनासाठी उपस्थित असतात .

### पान १ वरून....

**बीड शिक्षक आत्महत्या ...**

शहरातील स्वराज्यनगर भागात शिक्षण संस्थाचालकाच्या पतसंस्थेसमोर गळफास घेत आत्महत्या केली. त्यांनी आत्महत्येपूर्वी फेसबुकवर अनेक पोस्ट केल्या. शेवटच्या पोस्टमध्ये त्यांनी संस्थाचालकांवर छळाचे आरोप करत त्यांच्यामुळे आत्महत्या करत असल्याचे म्हटले. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती. आज विधान परिषदेत याच मुद्द्यावरून विरोधकांनी सरकारला घेरले.

चौकशी करुन गुन्हा दाखल होईल

अंबादास दानवे यांनी संस्थाचालकांवर गुन्हा का दाखल झाला नाही असा जाब सरकारला विचारला तर ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनीही हा मुद्दा उपस्थित करत, तात्काळ संस्थाचालकावर गुन्हा दाखल करा, अशी मागणी सभागृहात केली. त्यानंतर, याप्रकरणी सखोल चौकशी करून गुन्हा दाखल होईल, असे उत्तर राज्याचे गृह (ग्रामीण) राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत दिले.

**बीड जिल्ह्यात सुसज्ज...**

हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असताना याबाबतचा मूळ प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने केंद्र व राज्य सरकारकडे पाठवला होता. बीड जिल्ह्याच्या रेल्वे पाठोपाठ आता विमानतळाचे ही स्वप्न पूर्ण होणार असून गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आपल्या अर्थसंकल्पावरील भाषणात देखील विमानतळ उभारण्याची मागणी केली होती. विजयसिंह पंडित यांच्यासह ही मागणी वेळोवेळी केलेल्या सर्वच लोकप्रतिनिधींचे हे यश मानावे लागेल असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

**पवार कुटुंबीयांवर ...**

बालपण शिवाजी पार्क परिसरात गेले. त्यांचे शालेय शिक्षण तेथील बालमोहन विद्या मंदिरात झाले. रुईया महाविद्यालयातून त्यांनी कला शाखेची पदवी घेतली. चित्रकलेत त्यांचा हातखंडा असल्यामुळे पुढे त्यात त्यांनी पदव्युत्तर पदवी घेतली. त्यानंतर २२ ऑगस्ट १९७० रोजी त्यांचा प्रतापराव पवार यांच्याशी विवाह झाला. सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे पुण्यात आल्यावर 'सकाळ'च्या माध्यमातून त्या अनेक उपक्रमांत सहभागी होत. औंधजवळील बालकल्याण संस्थेमध्ये त्या सुमारे ३५ वर्षे सक्रिय होत्या. तेथे त्या विश्वस्तही होत्या.

बालकल्याण संस्थेतील प्रत्येक उपक्रमात त्या सहभागी होत. अनेक मुला-मुलींना त्यांनी तेथे चित्रकलेचे धडे दिले. तेथील अधिकारी, कर्मचाऱ्यांशीही त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. तसेच 'सकाळ' संचलित कोरेगाव पार्क आणि कोथरूड येथील अंधशाळेतही त्या विश्वस्त होत्या. तेथील अनेक उपक्रमांत त्या सहभागी होत.

### पान १ वरून....

**मराठवाड्याच्या शिरपेचात..**

जालना येथील जेईएस कॉलेजमधील एक प्रतिष्ठित सहायक प्राध्यापक आहेत.

काय आहे यंत्र?

कुठलही रसायनशास्त्राची असो की भौतिकशास्त्राची प्रयोगशाळा. तिथे संशोधनासाठी, वेगवेगळ्या प्रयोगासाठी आपल्याला नाना काचेची उपकरणे दिसतात. मात्र, ही उपकरणे स्वच्छ करणे अतिशय जिकरीचे काम. ते व्यवस्थित स्वच्छ केली नाही, तर त्यांच्या मदतीने जे प्रयोग केले जातात त्यावर गंभीर परिणाम होतो. अनेकदा त्यामुळे निघणारे निष्कर्षही चुकीचे असतात. हे लक्षात घेता डॉ. कुणाल दत्ता आणि डॉ. अरुणा म्हारोळकर यांनी स्मार्ट लॅबोरेटरी ग्लास वेअर वॉशर अँड ड्रायर हे यंत्र तयार केले. हे एक स्वयंचलित यंत्र आहे. जे प्रयोगशाळेतील काचेची उपकरणे स्वच्छ आणि कोरडे करते. त्यामुळे वेगवेगळे संशोधन करणारे शास्त्रज्ञ, संशोधक यांची उपकरणे स्वच्छ करण्याच्या जिकरीच्या त्रासातून सुटका होणार आहे. सोबतच संशोधनाचे निष्कर्ष अचूक निघण्याचे प्रमाणही वाढणार आहे.

**अजित पवारांच्या...**

म्हणाल्या की, मी २६ पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधातील पुरावे पोलिसाना दिलेत. त्यांनी माझा जबाबही घेतला. मी माझे सर्व पुरावे पेन ड्राईव्हच्या माध्यमातून दिलेत. आता पोलिसांनी चौकशी करून दोषी अधिकारी कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर जिल्ह्याबाहेर पाठवावे. यापैकी अनेक पोलिस कर्मचारी गत अनेक वर्षांपासून एकाच पोलिस ठाण्यात कार्यरत आहेत.

धनंजय मुंडेच पालकमंत्रिपद सांभाळत आहेत का?

तृप्ती देसाईंनी यावेळी धनंजय मुंडे हेच अजित पवारांच्या नावाने बीडचे पालकमंत्रिपद सांभाळत असल्याचाही आरोप केला. त्या म्हणाल्या, आजही बीड पोलिस दलातील अनेक अधिकारी वाल्मीक कराडला पाठिशी घालण्याचा प्रयत्न करत आहेत. कारण, येथील पालकमंत्रिपद आजही राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. अजित पवार तर कुठे दिसत नाहीत. ते दरवेळी आपण खूप चांगल्या पद्धतीने काम करतो असा दावा करतात. पण त्यानंतरही बीडमध्ये दररोज भयंकर घटना घडत असल्याचे उजेडात येत आहे. दादा त्यावर काहीच बोलत नाहीत. त्यामुळे अजित पवार पालकमंत्रिपद चालवत आहेत की त्यांच्या नावाने धनंजय मुंडे हेच कारभार पाहत आहेत हे कळत नाही.

आम्ही दिलेले पुरावे अत्यंत अचूक

ज्या पद्धतीने आष्टीची घटना पुढे आली, खोक्या भोसलेची घटना पुढे आली,

### पान १ वरून....

नागरगोजे नामक शिक्षकाची घटना घडली आहे. मग पालकमंत्री काय करत आहेत? पालकमंत्री बदलून काही फरक पडला आहे का? जर झाला नसेल, तर गुंडाराज थांबवता येत नसेल तर अधिवेशनातच या प्रकरणी योग्य तो निर्णय घेण्याची गरज आहे. पण तसा निर्णय घेताना कुणीही दिसत नाही. बीडला खरेच गुन्हेगारीमुक्त करायचे असेल, तर गुंडांना पाठिशी घालणारे, त्यांना आश्रय देणाऱ्या पोलिसांना जिल्ह्याबाहेर पाठवावे लागेल. धनंजय मुंडेंचा राजीनामा तातडीने झाला नाही. शेवटी काही पुरावे आल्यानंतर तो घ्यावा लागला. आम्ही सादर केलेले पुरावे अत्यंत अचूक आहेत. त्यामुळे दोषी अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई झाली पाहिजे, असे तृप्ती देसाई म्हणाल्या.

**पाषाण -दगडातूनच...**

स्वामी , प्रदर्शनाचे संयोजक प्रभाकर कुंटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री.दैठणकर म्हणाले की, हा समाज माध्यमांनी भरपूर क्रांती केली असली तरी जुन्या काळामध्ये महालक्ष्मीचे सूर्यदर्शन युवा सूर्याने घेतलेले महालक्ष्मीचे दर्शन अशा प्रकारची ६०० वर्षाची अनेक मंदिरे अजही टिकून आहेत ती जुनी असली तरी त्यातील वास्तुशिल्प, कारागिरी, स्थापत्य याविषयी जाणून घेणे गरजेचे आहे संभाजीनगर जिल्ह्यातील सुलीभंजन येथील शिळेवर दगड आपटल्यानंतर आपल्याला वेगवेगळे नाद ऐकू येतात.कुंटे दांपत्याने हा जो उपक्रम केला आहे ,तो जगा वेगळा आहे. आपण सर्वांनी मंदिरात गेलं पाहिजे .केवळ संकट आल्यावरच मंदिरात जावे ,असे नाही. बीड मधील सर्व मंदिरात एकदा तरी आपण भेट द्यावी तेथील सुधारणांकडे लक्ष देऊन त्यातील वैशिष्ट्ये जगासमोर आणून देण्याची गरज आहे त्या दृष्टीने हे प्रदर्शन अतिशय उपयुक्त आहे .

डॉ. बारकुल म्हणाले की भारतातील प्रत्येक गावामध्ये मंदिरआहे. धर्माचे धर्माचे अधिष्ठान भक्ती करण्याचे ठिकाण आपण हिंदू असल्याची ओळख त्यातून होते. या प्रदर्शनाच्या माध्यमातून हजारो मंदिराचा इतिहास आपल्यासमोर आला आहे. कसली साधने नसताना मंदिरे कशी बांधली असतील.येरमाळ्याच्या येडेश्वरी मंदिरातील दगडाचे खांब तिथपर्यंत कसे पोहोचले असतील त्याचबरोबर वेरूळच्या कैलास लेणे आधी शिखर मग पाया त्यावर मनमोहक आकार हे कसे तयार झाले असतील हे समजून घेणे गरजेचे आहे आज देवदर्शनालाही तरुण मंडळी मोठ्या प्रमाणात येत असून खऱ्या अर्थाने राष्ट्रसंवर्धनाचे काम होत आहे.

प्रास्ताविक राष्ट्रसंवर्धन संस्थेचे अध्यक्ष रवींद्र देशमुख यांनी केले सूत्रसंचालन प्रा. शांता जाधवर यांनी केले तर प्राध्यापक शशिकांत पसारकर यांनी आभार मानले. हे प्रदर्शन मंगळवार आणि बुधवार रोजीसकाळी नऊ ते रात्री आठ या वेळेत सर्वांसाठी खुले राहिलं.

## मयत दलित विकास बनसोडे कुटुंबीयांना बीड जिल्हा प्रशासनाने न्याय द्यावा – विष्णूबाळ झोडगे

प्रतिनिधी । बीड

आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथे एका ट्रक मालकाने ट्रक चालकाला दोन दिवस डांबून ठेवत मारहाण केली. ही मारहाण निघृणपणे करण्यात आल्याने याप्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी तसेच विकास बनसोडे या दलित तरुणांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करून पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी महाराजा मित्र मंडळआणि समदीप सामाजिक प्रतिष्ठानचे विष्णूबाळ दत्तात्रय झोडगे यांनी केली.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, विकास बनसोडे (रा. जालना) हा पिंपरी घुमरी येथील क्षीरसागर नावाच्या व्यक्तीच्या ट्रकवर चालक म्हणून कामाला होता. विकास आणि ट्रक चालक यांच्यात संशयावरून जोरदार वाद झाला. यातून राग आल्याने ट्रक मालक क्षीरसागर याने विकास बनसोडे याला डांबून ठेवत त्याला बेदम मारहाण केल्याचा आरोप विकासचा भाऊ आकाश बनसोडे याने केला आहे. या प्रकरणात आता आष्टी पोलिसांनी एका संशयितास ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरु आहे. गोरगरीब दलित समाजावर होत असलेल्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी बीड जिल्हा पोलीस प्रशासनाने ,पालकमंत्र्यांनी कठोर कारवाई करावी. अशी मागणी सामाजिक सामाजिक प्रतिष्ठान बीड तथा महाराजा मित्र मंडळ बीड यांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते विष्णूबाळ दत्तात्रय झोडगे यांनी केली आहे.

# धर्माबाद तालुक्यात आमदार चषक क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न

## भाजपा तालुकाध्यक्ष विजय पाटील डांगे यांचा उपक्रम

धर्माबाद । अशोक पडोळे




शिवजयंती निमित्त नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री राजेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार चषक २०२५ ही क्रिकेट स्पर्धा भाजपा तालुकाध्यक्ष विजय पाटील डांगे यांच्या संकलपनेतून आयोजित करण्यात आली होती या स्पर्धा उत्साहात खेळी मेळीच्या वातावरणात पार पडल्या.

अंतिम सामना सायखेड येथे झाला यावेळी नांदेड जिल्हा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ. पुनमताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला व विजेत्या उप विजेत्या संघास पारितोषिक आणि बक्षीस वितरणाचा कार्यक्रम पार पडला.प्रथम पारितोषिक धर्माबाद भाजपा तालुका अध्यक्ष विजय पाटील डांगे यांच्यातर्फे ५५५५५ रुपये ठेवण्यात आले होते.सदरील पारितोषक चघ ईं नरसी या संघाने पटकावले ,द्वितीय पारितोषक श्री गुलाब पाटील मोरे यांच्यातर्फे २२२२२ठेवण्यात आले होते . सदरील पारितोषक प्रवीण पाटील मित्र मंडळ चोळखा या संघाने पटकावले

तसेच तृतीय पारितोषक संतोष मोरे यांच्यातर्फे ११११११ ठेवण्यात आले होते सदरील पारितोषक क्रिकेट संघ भोकर या संघाने पटकावल आहे.या कार्यक्रमास भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते माजी सभापती दत्ताहरी पाटील चोळाखेकर, विठ्ठल पाटील चोळखेकर, उमरी भाजपा तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील सावंत, धर्माबाद शहरातील वर्णी नागभूषन, शंकर बोलमवाड, राजू सूरकुटवार यासह अनेक मान्यवर उपस्थित होते .

मोबाईलच्या युगात युवा वर्ग मैदानी खेळापासून दूर जात आहे या भागातील

युवकांना या स्पर्धेच्या माध्यमातून आपल्यातील खेळाडूवृत्ती दाखवता आली सांघिक खेळ भावना ठेऊन अतीशय चपळाईने ज्या संघाने खेळ खेळला तो विजेता ठरला आहे.अशा स्पर्धा भविष्यात देखील आयोजीत करण्यात येतील असे मत यावेळी भाजपा नेत्या महिला आघाडी जिल्हाध्यक्षा सौ पूनमताई पवार यांनी व्यक्त केले.विशेष म्हणजे फायनल मॅच चे युटूब लाईव्ह व मैदानातील ब्यानरबाजीचे फ्लेक्स सर्वांना आकर्षीत् करत होते...ग्रामीण भागातील खेळाडूनी या स्पर्धेत भाग घेऊन आपले कौशल्य दाखवले आहे खेळाडूंचा उत्साह पाहता येणाऱ्या काळात आमदार राजेश पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात येईल,व पुढील वर्ष्यात आमदार चष्काचे पारितोषिक अनेक पटीने वाढीव ठेऊन संबंध मराठवाड्याभर स्पर्धा गाजवल्या जाईल असे मत भाजपा तालुकाध्यक्ष विजय पाटील डांगे यांनी व्यक्त केले आहे..

## अण्णासाहेब पाटील महामंडळाने दिले

### ४२४८ उद्योजकांना ३२३ कोटी चे आर्थिक पाठबळ

प्रतिनिधी । बीड

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य अभियान योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात ४२४८ तरुणांना ३२३ कोटी २१लाख चे कर्जवाटप झाले आहे. तसेच या नवउद्योजकांना २८ कोटी ५२ लाख रुपयेचा व्याज परतावा त्यांच्या खात्यावर जमा झाला आहे. नियमित हप्ता भरणाऱ्यांना महामंडळाकडून व्याज परतावा दिला जातो, अशी माहितीअण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर यांनी दिली. महामंडळाकडून १०६११ तरुणांना पात्रता प्रमाणपत्र मिळाले आहे. शासनाने आर्थिक दुर्बल घटकातील युवकांना स्वयंरोजगारासाठी महामंडळाच्या माध्यमातून वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना आणि गट कर्ज व्याज परतावा योजना राबवल्या जातात. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून कर्ज योजनेमार्फत उद्योग व्यवसाय उभारण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अर्थसहाय्यामुळे बीड जिल्ह्यात महामंडळाच्या माध्यमातून तरुणांना स्वप्नांना साकार करण्याचे नवे बळ मिळाले आहे

नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्यांनाही नियमित व्याज परतावा येत आहे. तरुणांनी योजनेचा लाभ घ्यावा काही अडचणी असल्यास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क करावा,असे आवाहन महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर यांनी केले आहे.




## पाण्याचे साठवण आणि पाणी संवर्धनाबाबत जागरूकता शिबीर संपन्न

प्रतिनिधी । बीड

किमान समान कार्यक्रमाअंतर्गत न्या. आनंद एल. यावलकर , प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा बीडच्या वतीने घुले करीयर अकॅडमी, बीड येथे पाण्याचे साठवण आणि संवर्धन शिबीर १७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड समितीचे सचिव न्या. गजानन सोनी म्हणाले की, पाणी ही काळाची गरज असुन प्रत्येक व्यक्तीने पाण्याची बचत करणे गरजेचे आहे. त्याबरोबरच, या बाबत जागरूक राहणे ही तेवढेच महत्वाचे आहे. यावेळी कार्यक्रमासाठी प्रमूख उपस्थिती मध्ये न्या.गजानन सोनी सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, संजय शिंदे जलमित्र तथा सचिव हिंद संस्था, नेकनुर, ज्योतीराम घुले, तत्वशील कांबळे विधीदुत तथा अधिकार मित्र, मिथुन जोगदंड विधीदुत तथा अधिकार मित्र अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती बीड यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी बोलताना तत्वशील कांबळे म्हणाले की, निसर्गाचा समतोल ठेवायचा असेल तर पाणी वाचवणे गरजेचे आहे, आज पाणी या प्रश्नावर काम करणारे संपुर्ण जगाला असा संदेश देतात की, तिसरे महायुध्द झाले तर ते पाण्यासाठी होउ शकते. त्यामूळे बीड जिल्हयाला दुश्काळापासुन वाचविण्यासाठी पाणी आडवा पाणी जिरवा व आपल्या रोजच्या जिवनात पाण्याचा काटकसरीने वापर करावा असा संदेश दिला.कार्यक्रमाचे आभार मिथुन जोगदंडयांनीमानले.



बीड – शिवसेना (उठाबा ) पक्षाच्या जिल्हाप्रमुखपदी उल्हास गिराम यांच्या निवडी निमित्त शुभेच्छा देतांना खरेदी विक्री संघांचे चेअरमन जगदीशजी काळे, दिनकर कदम, अरुण नाना डाके, विलास बापु बडगे, सखाराम मस्के, वसंत सानप, अरुण बोगाने, कलंदर पठाण आदी.



बीड – शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांनी मस्साजोग या ठिकाणी भेट देऊन दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी तपास यंत्रणेवर सविस्तर चर्चा केली. या प्रकरणाची सुनावणी केज ऐवजी बीडच्या जलदगती न्यायालयात व्हावी ही धनंजय देशमुख यांची मागणी आहे. या संदर्भात पाठपुरवठा करू असे उल्हास गिराम यांनी सांगितले. यावेळी जेष्ठ शिवसैनिक विलास महाराज शिंदे, संदीप उबाळे, नवनाथ प्रभाळे, सुधीर भांडवले, सुशील पिंगळे, संजय महाद्वार, पंकज कुटे, बंटी परदेशीं सह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# जीवनात पुढे जाण्यासाठी दृष्टी असली पाहिजे-जल संधारण अधिकारी मानसी जोशी

## वडिलांचे छत्र हरवलेल्या मानसीने घेतली झेप पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने गुणी कर्तृत्वाचा गौरव

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

गुणगौरव हा प्रेरणा व ऊर्जा देण्यासाठी असतो शैक्षणिक गुणवत्तेतूनच जीवनाचा विकास होतो सर्वांगीण विकास साधून जीवनात पुढे जाण्यासाठी दृष्टी असावी लागते असे मत धाराशिव येथील जलसंधारण विभागातील अधिकारी मानसी जोशी यांनी व्यक्त केले.

जलसंधारण विभागात वर्ग दोन अधिकारीपदी मानसी जोशी यांची निवड झाल्याबद्दल येथील पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने मानसी जोशी यांचा गौरव करण्यात आला त्यावेळी सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या. आपल्या मार्ग दर्शनपर मनोगतात त्यांनी सांगितले की पालकांनी पाल्यासोबत गुणवत्ते संबंधी चर्चा केली पाहिजे आणि विद्यार्थ्यांनी देखील जिद्द, चिकाटीने शिक्षण घेतल्यास घवघवीत यश प्राप्त होते समाजाच्या चांगुलपणासाठी योगदान देणाऱ्या कार्य कतृत्वाचा गौरव करण्यासाठी पेशवा प्रतिष्ठान सारख्या संस्था आहेतच ही काळ्या दगडावरील पांढरी रेष आहे कठोर



परिश्रम विनम्रता आणि मोबाईल पासून दूर राहणे ह्या गोष्टी घेतल्यातर यश आपल्या जवळच आहे असे सांगून त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या अंबाजोगाईच्या योगेश्वरी शिक्षण संस्थेत आपले विद्यालयीन, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाले त्याबरोबरच अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनाच्या सरळ सेवेच्या भरतीप्रमाणे मराठवाड्यातच धाराशिव येथे जलसंधारण अधिकारी वर्ग दोन पदी आपली निवड झाली आणि मी माझी आई श्रीमती सुरेखा जोशी हिचे स्वप्न पुर्ण केले आपण लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली असल्याचे मानसी जोशी यांनी सांगितले.

यावेळी पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत मानसी जोशी यांचा गौरव करण्यात आला या प्रसंगी प्रतीक्षा जोशी,रोहिणी जड,कल्याणी कुलकर्णी,अनिता औटी, वर्षा मिरगे,प्रणिता पोखरीकर,प्रणिता सेलमोकर,सुरेखा जोशी,उज्वला गोस्वामी अविनाश जोशी,रमेश कुलकर्णी,पत्रकार प्रशांत बर्दापूरकर, राहूल देशपांडे,डॉ.महेश अकोलकर,पदमाकर सेलमोकर,दुर्गादास दामोशन,डॉ.प्रविण जोशी,विनायक गोस्वामी,संकेत तोरंबेकर,किरण गोस्वामी,केदार दामोशन,शिशिर हिरळकर,सराफ आदी उपस्थित होते.

# पाटोदा येथील पत्रकार भवनांचा प्रश्न मार्गी लावावा

## पाटोदा येथील आमसभेत पत्रकार महेश बेदरे यांची आ. सुरेश आण्णा धस यांच्याकडे मागणी

प्रतिनिधी । पाटोदा

लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असणाऱ्या पत्रकारांसाठी पाटोदा शहरात मागील अनेक वर्षांपासून मागणी असताना कोणतीही हक्काची जागा उपलब्ध नाही पत्रकार भवनाच्या मागणीसाठी अनेक ज्येष्ठ पत्रकारांनी वेळोवेळी निवेदने पत्र दिलेले आहेत परंतु या संदर्भात प्रशासकीय स्तरावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही पत्रकारांसाठी हक्काची जागा उपलब्ध व्हावी यासाठी आपण स्वतः दखल घेऊन या संदर्भात प्रयत्न करावेत अशी मागणी बीड जिल्हा पत्रकार संघाचे पाटोदा तालुका अध्यक्ष ड महेश बेदरे यांनी केली. पाटोदा शहरात रविवार रोजी आ. सुरेश आण्णा धस यांची आम सभा पार पडली या आमसभेप्रसंगी पत्रकारांच्या प्रश्नांसंदर्भात बोलताना महेश बेदरे यांनी सांगितले की पत्रकार भवनाच्या प्रश्नासाठी १९९२ ९३ या वर्षांपासून पाटोदा शहरातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांनी मागण्या केल्या आहेत पाटोदा शहर व परिसराला प्रतिभासंपन्न



पत्रकारांचा समृद्ध वारसा आहे ज्येष्ठ पत्रकार सोमीनाथ कोल्हे , इद्रीस भाई चाऊस कादर मकरानी विजय जोशी दयानंद सोनवणे तुकाराम तुपे यांच्यासह अनेक ज्येष्ठ पत्रकारांनी या सदर्भात वेळोवेळी निवेदने पत्र शासनाला दिलेली आहेत त्यावेळी शासनाने गट नंबर ३२९ मधील काही जागा शिल्लक असल्यास त्याची चाचपणी करावी अशी जिल्हाधिकारी यांनी तहसीलदार यांना पत्राद्वारे कळविण्यात आले होते परंतु त्यानंतर प्रशासकीय उदासीनतेमुळे या संदर्भात कोणतीही हालचाल आत्तापर्यंत होऊ शकली नाही आता आमदार सुरेश धस हे स्वतः या भागाचे लोकप्रतिनिधी असून जनतेच्या समस्या रोज मांडणाऱ्या पत्रकारांची ही महत्त्वाची मागणी ते मार्गी लावतील अशी आशा व विश्वास यावेळी बेदरे यांनी व्यक्त केला यावर उत्तर देताना आमदार सुरेश धस यांनी देखील पत्रकार भवनाच्या संदर्भात आपण येत्या काळात योग्य ती कार्यवाही करू मी आज कोणताही जाहीर शब्द देत नाही परंतु या संदर्भात पुढील काळात पत्रकारांच्या मागणीची निश्चित सकारात्मकपणे दखल घेतली जाईल असे आश्वासन

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/२०२
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- १०/०६/२०२४

अर्जदार श्री./ :- १)गणेश दामोदर शिंगाडे २)राजेश्री गणेश शिंगाडे दोघे रा.चिंचखेड ता.अंबड जि.जालना प्रकरण :- प्लॉट नं.३५ न.प.मि.नं.१८-७६-३५ चे हस्तांतरण करणे बाबत.सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( १८-७६-३५ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला ----------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- रमेश देविदास राठोड यांचे घर
पश्चिम :- रस्ता
दक्षिण :- अमोल जोशी व अश्विनी जोशी यांचे रो-हाऊस क्रं.२
उत्तर :- दिनकर धुपे यांचे घर

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# कापशी तलावाची उंची वाढवल्याने ऊस तोडणी साठी स्थलांतरीतांचे प्रमाण कमी होईल

प्रतिनिधी । आष्टी

गेल्या दहा वर्षांत दोन आमदार मतदार संघाला मिळाले पण एकाही आमदाराला या कापशी तलावाची उंची वाढवण्याचे काम करू शकले नाहीत. तलावाचे उंची वाढवण्याचे काम झाले असते तर या गावातील कमीत कमी ५० कोयते ऊस तोडायला गेले नसते. त्यामुळे स्थलांतरणाचे प्रमाण कमी झाले असते. आता या तलावाची उंची वाढवून २५० हेक्टर जमिन ओलीताखाली येणार असल्याने गावकऱ्यांनी या कामांसाठी हेवेदावे बाजूला ठेऊन एकत्र येऊन सहकार्य करावे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

आष्टी तालुक्यातील कापशी येथे मृद व जलसंधारण विभाग बीड,१०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेचा शुक्रवार दि.१४ रोजी सकाळी ११ वा.




साठवण तलावाचे गणेश गडाचे महंत ह. भ. प. काशीनाथ महाराज व धर्मराज गडाचे महंत ह. भ. प. रोहिदास गर्जे महाराज यांच्याहस्ते भूमीपुजन करण्यात आले.

यावेळी आमदार सुरेश धस बोलत होते. यावेळी जि. प. सदस्य अमर निंबाळकर, आष्टी तालुका दुध संघाचे चेअरमन संजय गाढवे, माजी सभापती छत्रगुण मरकड, एन. टी. गर्जे, नारायण वनवे, बाबु गर्जे, नवनाथ गर्जे, नवनाथ नागरगोजे, लक्ष्मण ननवरे यांच्यासह आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलतांना आ. धस म्हणाले, मला विकासाच्या कामात टिका टिप्पणी करायची नाही पण दहा वर्षांत मतदार संघाला दोन आमदार झाले. त्यांना हा कापशीचा तलाव का दिसला नाही जर हा तलाव झाला असता तर किमान ५० कोयता तोडणारांची संख्या कमी झाली असती. आता शेतकऱ्यांनी या तलावासाठी सहकार्य करून एका वर्षात तलावाचे काम मार्गी लावतो. हा साठवण तलाव अतिशय नॅचरल साइटवर असून या साठवण तलावामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे काम होणारा असून कापशी परिसरातील क्षेत्र ओलीताखाली जाणारा असल्याने मला मनस्वी आनंद होत असून अनेक दिवसाची ही मागणी आज पूर्णत्वाकडे जात असल्याने गाव पुढाऱ्यांनी गावातील तलावाच्या अडचणी सोडवा. प्रशासकीय अडचणी मी सोडतो असा शब्दही आ. धस यांनी दिला. ह. भ. प. काशीनाथ महाराज म्हणाले, आमदार सुरेश धस यांची मतदार संघात नाळ जुळलेली असून त्यांनी विकासाचे राजकारण केले व करत आहेत. विकासाचं दृष्टिकोन असलेलं हे व्यक्तिमत्व आहे.

यावेळी व्हाईट चेअरमन अशोक गर्जे, सुंदरलाल गर्जे, सरपंच महाडिक, सरपंच नंदकिशोर करांडे, सरपंच विकास पवार, सरपंच अशोक इथापे, फारुख मामा, बबन तरटे, शेषराव गर्जे फौजी, पोपट गर्जे, रेवननाथ खाडे, मारुती डीसले, नितीन नाकाडे, वैभव गोल्हार, धनंजय तरटे, शिवाजी गर्जे, काकासाहेब गर्जे, आश्रुबा खलाटे, माणिक दहिफळे, अशोक तरटे, श्रीराम केदार आदीसह कापशी व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैकुंठात दुर्मिळ असणारा काला आपल्याला मृत्यूलोकात साधु संतांच्या कृपेमुळे मिळतो - ह. भ. प. संतोष महाराज मोरे

**प्रतिनिधी** । आष्टी

संसारातील कोणत्याच गोष्टींनी कोणाचीही तृप्ती होत नसते. संसार सुखाचे मागे जाऊनही मानव अखेर अतृप्तच राहत असतो. आपण श्रीकृष्णाच्या चरित्राचे उच्चारण करतो मात्र व्यवहारात आणि आचरणात मात्र विसंगती आढळून येते कृष्णाच्या चरित्रातील दहीदुधाची चोरी या गोष्टीतून त्यांनी अध्यात्म कारण, भक्ती कारण, समाजकारण आणि राजकारण अशी चार कारणे आहेत असे सांगत श्रीकृष्णाने गोकुळात केलेले चरित्र उच्चारले जाते केले देवे गोकुळी दश चरित्रे उच्चारली जावीत असा वारकरी संप्रदायाचा, काल्याच्या कीर्तनाचा नियम आहे. दुर्मिळ असणारा काला आपल्याला मृत्यु लोकात साधु संतांमुळे मिळतो असे प्रतिपादन ह. भ. प. संतोष महाराज मोरे यांनी केले.



आष्टी शहरातील वसंतनगर येथील श्री जगतगुरु तुकाराम महाराज मंदीरात सुरु असलेल्या ३७५ वा. त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी संत तुकाराम महाराज बीज अखंड विठ्ठल नाम सप्ताह सोहळ्यात ह. भ. प. संतोष महाराज मोरे बोलत होते.

यावेळी राजेंद्र धोंडे, सरपंच सौ. शालन मुळे, माजी सरपंच सौ. आदिकाताई लोखंडे, सौ. चंद्रकला नालकोल, सौ. धोंडे, सौ. मुक्ता खेडकर, छानबाई पाटील, राम ससाणे सर, घनशाम खलासे, त्रिंबक ईजारे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, अशोक डोके सर, किसनराव रासकर, हरिचंद्र बोडखे सर, सोनाजी बनकर महाराज, सोपान जोगदंड, अमोल बळे महाराज, हौसराव आजबे महाराज, उध्दव विधाते, लाला महाराज राक्षे, अशोक काकडे, गोपीनाथ पोकळे, बाळासाहेब रासकर, प्रा. सुभाष रासकर, प्रकाश खेडकर, पांडुरंग पोकळे, बलभीम धोंडे, शिवदास केरुळकर, प्रा. संदीप रासकर, नानासाहेब तवले, अनारसे सर, शाहुराव लाड, पुष्पाताई शिंदे, मुक्ताताई गणगे, फुलाबाई, कुसुमताई काळे आदि मान्यवर उपस्थित होते.

कंठी धरीला कृष्णमणी !अवघा जनी प्रकाश, काला वाटू एकमेका।

वैष्णव निका संभ्रम,वाकुलिया ब्रम्हादिकां । उत्तम लोका दाखवूं

तुका म्हणे भूमंडळी । आम्ही बळी वीर गाढे या संत तुकाराम महाराज यांच्या अंभगावर काल्याचे कीर्तन केले. पुढे बोलताना ह. भ. प. मोरे महाराज म्हणाले की, काला तीन प्रकारचा असतो.स्थुल देहासाठी दही - लाईचा काला,सुक्ष्म देहासाठी हरीनामाचा काला आणि कारण शरीरासाठी (आत्मस्वरुपाचे अज्ञान) जीव शिवाचा काला असतो. स्थुल कृपेचा काला, सुक्ष्म कृपेचा काला, द्रुक (दर्शन, दृष्टी) कृपेचा काला आणि संकल्प कृपेचा काला असतो. संत महात्मे देवाची अनुभुती घेतात आणि ईतर भक्तांना देवाची अनुभुती करुन देतात असेही ह. भ. प. मोरे महाराज यांनी सांगितले.

# आपले हक्क मिळविण्यासाठी एकजुटीने लढा!

## शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या सांगता सोहळ्यात शामसुंदर महाराज सोन्नर यांचे आवाहन

**प्रतिनिधी** । परळी



शेतकरी किती संकटातून जात आहे, त्यांच्या समोर कोणकोणती आव्हाने आहेत, याची जाणीव शेतकरी कीर्तन महोत्सवातील तज्ज्ञ वक्त्यांनी आपल्याला करून दिली आहे. या संकटाचा सामना करीत आपले हक्क मिळवायचे असतील तर शेतकऱ्यांनी एकजुटीने लढा उभारावा, असे आवाहन प्रसिद्ध कवी, ज्येष्ठ पत्रकार ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी केले. शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या सांगता सोहळ्यात काल्याचे कीर्तन करताना त्यांनी हे आवाहन केले तर शेतकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर आणून ते सोडविण्यासाठीच हा कीर्तन महोत्सव आहे, असे शेतकरी चळवळीतील अड. अजय बुरांडे म्हणाले.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या बीजोत्सवानिमित्त गेल्या तीन वर्षांपासून शेतकरी कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले जाते. या कीर्तन महोत्सवात २५ गावातील शेतकऱ्यांचा सहभाग असतो. या वर्षी शास्वत शेती ही मध्यवर्ती संकल्पना घेवून कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले होते. यात भजन कीर्तनाबरोबरच शास्वत शेतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ वक्त्यांची व्याख्याने आयोजित केली होती. याचा संदर्भ देत शामसुंदर महाराज म्हणाले की, सात दिवसांत शेतीच्या ज्या प्रश्नावर आपण चिंतन केले आहे ते सोडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शेतकऱ्यांवरील संकट नैसर्गिक नाही तर ते मानव निर्मित आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त अडचणीत आणू त्यांना शेती बाहेर काढायचे आणि ही शेती उद्योगपतींच्या घशात घालायची, हे आता स्पष्ट झाले आहे. हे कारस्थान उधळून लावण्यासाठी शेतकऱ्यांनी एकजुटीने लढा दिला पाहिजे. या परिसरात शेतकरी चळवळ ही वेगवेळी आंदोलने, उपक्रम राबवून शेतकऱ्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्यावरील अन्याय्याची जाणीव व्हावी आणि त्यांनी एकजुने आपल्या हक्कासाठी लढा उभारावा असा त्यांचा कायम प्रयत्न असतो. शेतकरी कीर्तन महोत्सव हा त्याचाच भाग असल्याचे शामसुंदर महाराज यांनी सांगितले.

शेतकरी बांधवांनो एक व्हा-विजय आपलाच असेल

शेतकरी बांधवांनो रात्रच नाही तर दिवसही वैऱ्यांचा आहे. किती संकटात आपण आहोत, हे गेल्या सात दिवसांत आपण ऐकलेले आहे. आपल्याला आपल्या प्रश्नांची जाणीव होऊ नये म्हणून जात, धर्माच्या कैफात आपल्या गुंतवून ठेवले जात आहे. आपण जात, धर्माच्या नावाने विभागलो जावे. द्वेष, मत्सराच्या वणव्यात जळत रहावे आणि आपल्याला आपले प्रश्न गौन वाटावेत यासाठी ही कारस्थानं आहेत. बांधवानो शेतकरी हीच आपली जात आणि शेती करणे हाच आपला धर्म आहे, या भावनेने सर्व जात-धर्मातील शेतकऱ्यांनी एक व्हावे आणि आपल्या प्रश्नासाठी लढावे. शेतकरी कीर्तन महोत्सव हा जात धर्माच्या पलिकडे जाऊन शेतकरी हा भावना दृढ व्हावी यासाठीच आहे. हा आपला प्रयत्न यशस्वी झाला आणि आपण एक होऊन शेतकऱ्यांच्या एकजुटीने लढा उभारला तर विजय आपलाच असेल, असा विश्वास अड. अजय बुरांडे यांनी व्यक्त केला.

## महीरा शेख इरफान हिचा जीवनाचा पहिला रोजा



**प्रतिनिधी** । जाफराबाद

पवित्र रमज़ान महिन्याला सुरू झाला आहे असुन या महिन्यामध्ये रोजे, तरावीह ची नमाज़, व ईबादत करतात इस्लाम धर्मामध्ये रमज़ान महिन्याला अत्यंत महत्वाचा तसेच पवित्र मानले जाते.असेच जाफराबाद शहरातील येथील शेख अकतर यांची नात महीरा शेख इरफान (वय ७ वर्ष) या छोट्या चिमुकली ने, आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण केले सध्याचे तापमान आणि रखर खत्या उन्हात पहाटे पाच वाजेपासून संध्याकाळी सात वाजेपर्यंत अन्नाचा एक ही कण आणि पाण्याचा एक ही थेंबही न घेता दिवसभर उपाशी राहून त्यांनी अल्ला प्रति आपली श्रद्धा व्यक्त केली कमी वयात जीवनाचा पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल दादा -दादी , आतीया - काका, मम्मी - पप्पा नाना-नानी ,काका काकी मामा- मामी ,माऊसा- माऊसी यांच्या कडून महीरा शेख इरफान हिचे रोजा ठेवल्याने चिमुकली चे कौतुक व सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

## आपण सर्वांनी जबाबदारीने पाणी वापरले तरच

## भविष्यातील पिढ्यांना पाणी मिळेल - जलदुत बाजीराव ढाकणे

**प्रतिनिधी** । बीड

राज्यात १६ मार्च ते २२ मार्च दरम्यान साजरा केला जातो जलजागृती सप्ताह या निमित्ताने आपणही पाणी जपून वापरले पाहिजे असे मत बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले .पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीसाठी पाणी अनिवार्य आहे. मानव, प्राणी,वनस्पती आणि संपूर्ण पर्यावरणाच्या संतुलनासाठी पाण्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.मानवी आरोग्यासाठी आवश्यक - शरीरातील सर्व क्रियांसाठी पाणी आवश्यक आहे. निर्जलीकरण टाळण्यासाठी आणि आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी पुरेसं पाणी पिणं गरजेचं आहे.अन्न उत्पादनासाठी पाणी महत्त्वाचे - शेतीसाठी पाणी अत्यंत महत्त्वाचे आहे. पाण्याच्या अभावामुळे अन्नधान्य उत्पादनावर मोठा परिणाम होतो.उद्योग आणि ऊर्जा निर्मिती - अनेक उद्योगांमध्ये आणि वीज निर्मितीसाठी पाणी लागते. जलविद्युत प्रकल्प हे ऊर्जा निर्मितीचे मोठे स्रोत आहेत.पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आवश्यक - नद्या, सरोवरे, भूजल आणि समुद्र यांचा परिसंस्थेच्या संतुलनात मोठा वाटा आहे.



पाणी वाचवण्याचे उपाय - पाण्याची नासाडी टाळा आणि आवश्यकता असल्यासच वापरा.गळणाऱ्या नळांची दुरुस्ती करा आणि पाणी साठवून ठेवा.पाण्याचा पुनर्वापर करा, जसे की भांडी धुतलेल्या पाण्याचा झाडांना उपयोग करा.झाडे लावा आणि जंगलतोड रोखा, कारण वृक्ष भूगर्भातील पाण्याची पातळी टिकवतात.आपल्या शिवारात जल संधारण करून भूगर्भातील जलसाठा वाढवा.जर आपण सर्वांनी जबाबदारीने पाणी वापरले तर भविष्यातील पिढ्यांसाठी पाणी टिकवता येईल. पाणी आहे तरच आपले जीवन आहे! असे मत जलप्रेमी बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले.





# खोक्याच्या कुटुंबियांसह ढाकणे कुटुंबियांचीही घेतली भेट

## कोणाचे घर पाडणे योग्य नाही - आ. सुरेश धस

**प्रतिनिधी** । मानुर

**सतीश भोसले उर्फ खोक्याला अटक केल्यानंतर वन विभागाच्या जागेत अतिक्रमण करून बांधलेले घर वन विभागाने कारवाई करीत जमिनोदोस्त केले. त्यानंतर अज्ञात लोकांनी उघड्यावर पडलेले त्याचे घर जाळल्याचा आरोप खोक्याच्या कुटुंबियांनी केल्यावरून शिरूर ठाण्यात या प्रकरणी गुन्हाही नोंद झाला आहे. दि १६ रोजी आ. सुरेश धस यांनी खोक्याच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांची चौकशी केली. यावेळी कुटुंबियांनी आमच्यावर सरकारने अन्याय केल्याची भावना बोलून दाखवली. त्यावर सुरेश धस यांनी कोणाचे घर पाडणे योग्य नाही अशी प्रतिक्रीया माध्यमांना दिली.**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण ताजे असतानाच 'खोक्या' उर्फ सतीश भोसले याचे काही गैरप्रकार आणि पैशाचा माज दाखवणारे व्हिडीओ व्हायरल झाले होते. त्याने एका व्यक्तीला अमानुषपणे बेदम मारहाण केल्याचेही प्रकरण समोर आले होते. तो आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता असल्याचेही स्पष्ट झाले होते. पोलीस शोध घेत असताना अखेर खोक्याला प्रयागराजमधून पोलिसांनी बेड्या ठोकल्या.

बीड पोलीस सतीश भोसले याला घेऊन छत्रपती संभाजीनगरमध्ये पोहोचते. तत्पूर्वी, सतीश भोसलेच्या ठिकाणांवर वनविभागाने बुलडोझर चालवत कारवाई केली. या कारवाईबद्दल बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की, त्याचे घर पाडले आहे. ते कोणत्या नियमांनी त्यांनी पाडले, याचे उत्तर आम्हाला मिळाले, तर बरे होईल. जेवढा मोठा त्याला करून दाखवला, तेवढा मोठा तो नाही. आता त्याची परिस्थिती काय झाली, हे पाहाना. आता राहायला

घरही नाही, काहीच नाही. चुकला असेल, तर त्याला त्या पद्धतीने शिक्षा मिळायला. हवी. परंतु, वन विभागाने कोणतीही नोटीस न बजावता त्याचे घर पाडले. हा नियम कोणता आहे. त्यांच्या पुनर्वसनाच्या बाबतीत आम्ही गांभीर्याने विचार करू. तात्पुरता दिलासा देण्याबाबत विचार करू, असे सुरेश धस यांनी स्पष्ट केले, कोणाचे घर पाडणे ही चांगली गोष्ट नाही. मी आता तिथे जाणार आहे. वन खात्याच्या काही लोकांना बोलावले आहे, त्यांच्याशी मी बोलतो. कोणाचे घर पाडणे ही चांगली गोष्ट नाही. ती ॲक्शन का घेण्यात आली ? हे सुद्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे मी बोलणार आहे, असे सुरेश धस यांनी म्हटले आहे.





बीड - येथील सहयोग नगर मधील सर्वेश्वर गणेश मंदिरात 'गाणारे दगड बोलणारे पाषाण' छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी डॉ.अनिल बारकुल,वैभव स्वामी,रवींद्र देशमुख, गणेश बलदवा,प्रभाकर कुंटे आदी.(दुसर्या छायाचित्रात) प्रदर्शनाचे अवलोकन करताना नागरिक.

# माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांनी अंबाजोगाई पिपल्स बँकेस सदिच्छा भेट

**प्रतिनिधी** । अंबाजोगाई

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी नुकतीच अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी बँकेचे मुख्यालय सहकार भवन येथे अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या हस्ते धिरज देशमुख यांचा फेटा बांधून तसेच शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पिपल्स बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी,कापूस पणन महासंघाचे संचालक ॲड विष्णुपंत सोळंके , बीड जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष कचरूलाल सारडा, माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा, सुनील वाघाळकर, गणेश मसने, ॲड अनिल लोमटे हे उपस्थित होते.

या सदिच्छा भेटी दरम्यान धिरज देशमुख तथा राजकिशोर मोदी यांच्यामध्ये बँकिंग क्षेत्रातील विविध विषयावर सखोल चर्चा झाली. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तथा अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या विविध योजनाबाबत देखील चर्चा झाली. ५५० कोटीच्या ठेवी तसेच १९ कोटी गुंतवणूकीच्या माध्यमातून आज अंबाजोगाई पिपल्स बँक महाराष्ट्र



भर ग्राहकांना सेवा पुरवत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी नमूद केले. अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या कार्यरत वीस शाखाबद्दल सविस्तर माहिती देतांनाच भारतीय रिझर्व्ह बँकेने नुकत्याच निलंगा, मुरुड, केज या नवीन तीन शाखांना परवानगी दिल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले. अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचा सुरू असलेल्या व्यवसाय, बँकेची सतत वाढत असलेली वृद्धी तसेच हजारो ग्राहकांनी बँकेवर ठेवलेला विश्वास हे पाहून धिरज विलासराव देशमुख यांनी अतिशय आनंद व्यक्त करत यापूर्वी बँकेची दिवसेंदिवस अशीच भरभराट होवो अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

दोन्ही नेत्यांच्या या भेटीदरम्यान सध्याच्या राजकीय परिस्थितीवर देखील चर्चा झाली. गढूळ झालेले सध्याचे राजकारण व त्यास दिला जाणारा जातीय रंग याबाबत चिंता व्यक्त करत हे चित्र बदलण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे देखील याप्रसंगी चर्चिले गेले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आपले हक्क मिळविण्यासाठी एकजुटीने लढा !

## शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या सांगता सोहळ्यात शामसुंदर महाराज सोन्नर यांचे आवाहन

परळी / प्रतिनिधी

शेतकरी किती संकटातून जात आहे, त्यांच्या समोर कोणकोणती आव्हाने आहेत, याची जाणीव शेतकरी कीर्तन महोत्सवातील तज्ज्ञ वक्त्यांनी आपल्याला करून दिली आहे. या संकटाचा सामना करीत आपले हक्क मिळवायचे असतील तर शेतकऱ्यांनी एकजुटीने लढा उभारावा, असे आवाहन प्रसिद्ध कवी, ज्येष्ठ पत्रकार ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी केले. शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या सांगता सोहळ्यात काल्याचे कीर्तन करताना त्यांनी हे आवाहन केले तर शेतकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर आणून ते सोडविण्यासाठीच हा कीर्तन महोत्सव आहे, असे शेतकरी चळवळीतील अड. अजय बुरांडे म्हणाले.




जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या बीजोत्सवानिमित्त गेल्या तीन वर्षांपासून शेतकरी कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले जाते. या कीर्तन महोत्सवात २५ गावातील शेतकऱ्यांचा सहभाग असतो. या वर्षी शास्वत शेती ही मध्यवर्ती संकल्पना घेवून कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले होते. यात भजन कीर्तनाबरोबरच शास्वत शेतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ वक्त्यांची व्याख्याने आयोजित केली होती. याचा संदर्भ देत शामसुंदर महाराज म्हणाले की, सात दिवसांत शेतीच्या ज्या प्रश्नावर आपण चिंतन केले आहे ते सोडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शेतकऱ्यांवरील संकट नैसर्गिक नाही तर ते मानव निर्मित आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त अडचणीत आणू त्यांना शेती बाहेर काढायचे आणि ही शेती उद्योगपतींच्या घशात घालायची, हे आता स्पष्ट झाले आहे. हे कारस्थान उधळून लावण्यासाठी शेतकऱ्यांनी एकजुटीने लढा दिला पाहिजे. या परिसरात शेतकरी चळवळ ही वेगवेळी आंदोलने, उपक्रम राबवून शेतकऱ्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्यावरील अन्याय्याची जाणीव व्हावी आणि त्यांनी एकजुने आपल्या हक्कासाठी लढा उभारावा असा त्यांचा कायम प्रयत्न असतो. शेतकरी कीर्तन महोत्सव हा त्याचाच भाग असल्याचे शामसुंदर महाराज यांनी सांगितले.

शेतकरी बांधवांनो एक व्हा-विजय आपलाच असेल

शेतकरी बांधवांनो रात्रच नाही तर दिवसही वैऱ्यांचा आहे. किती संकटात आपण आहोत, हे गेल्या सात दिवसांत आपण ऐकलेले आहे. आपल्याला आपल्या प्रश्नांची जाणीव होऊ नये म्हणून जात, धर्माच्या कैफात आपल्या गुंतवून ठेवले जात आहे. आपण जात, धर्माच्या नावाने विभागलो जावे. द्वेष, मत्सराच्या वणव्यात जळत रहावे आणि आपल्याला आपले प्रश्न गौन वाटावेत यासाठी ही कारस्थानं आहेत. बांधवानो शेतकरी हीच आपली जात आणि शेती करणे हाच आपला धर्म आहे, या भावनेने सर्व जात-धर्मातील शेतकऱ्यांनी एक व्हावे आणि आपल्या प्रश्नासाठी लढावे. शेतकरी कीर्तन महोत्सव हा जात धर्माच्या पलिकडे जाऊन शेतकरी हा भावना दृढ व्हावी यासाठीच आहे. हा आपला प्रयत्न यशस्वी झाला आणि आपण एक होऊन शेतकऱ्यांच्या एकजुटीने लढा उभारला तर विजय आपलाच असेल, असा विश्वास अड. अजय बुरांडे यांनी व्यक्त केला.

# बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा



आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश

बीड (प्रतिनिधी)

आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती, त्यांच्या मागणीला यश आले असून उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा उल्लेख करून विधानसभेत बीड येथे नवीन विमानतळ उभारण्याची घोषणा केली. यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असून जिल्ह्यातील उद्योग वाढीला मोठा फायदा होणार आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सक्रिय सहभाग नोंदवत विविध विषयांची प्रभावी मांडणी केली आहे. अर्थमंत्री ना अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चे दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती. अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून बीड येथे नवीन विमानतळ उभारणीसाठी कार्यवाही सुरू करत असल्याची घोषणा केली. यामुळे बीड येथे नवीन विमानतळ उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. बीड जिल्हाधिकारी यांनी याबाबतच प्रस्ताव पाठवला असून त्यावर भूसंपादन आणि इतर सोपस्कार व्हावे तसेच इतर बाबीवर कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असे सांगून बीड येथे कमीत कमी तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारली जाईल असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला विकासाच्या टप्प्यात येता येणार आहे. पर्यटन आणि इतर व्यवसायाला चालना मिळेल असेही ते यावेळी म्हणाले.

दरम्यान विजयसिंह पंडित यांनी विधानसभा सदस्य झाल्यानंतर आपल्या भागातील विकासाचे अनेक प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले. जलसंधारण, कृषी याबरोबरच विमानतळ उभा करण्याची मागणी करून त्यांनी आपल्या भविष्यवेधी नेतृत्वाची झलक दाखवली. आ. विजयसिंह पंडित यांनी बीडच्या विमानतळाचा प्रश्न निकाली काढल्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व स्तरातून त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.

# महाराष्ट्रात ८ दिवसांत वाळू धोरण, १५ दिवसांत वाळू न दिल्यास तहसीलदारांवर कारवाई; महसूलमंत्र्यांची घोषणा

प्रतिनिधी । मुंबई

राज्य सरकारकडून लवकरच नवं वाळू धोरण लागू करण्यात येत आहे. त्यामुळे, नागरिकांना बांधकामासाठी वाळू सहज उपलब्ध होईल. यासंदर्भात अधिवेशनात आज विधानसभेत चर्चा झाली. अर्ज केल्यानंतर १५ दिवसांत वाळू न दिल्यास कारवाई करणार का? रेती संदर्भात अनेक अधिकारी हे धृतराष्ट्राच्या भूमिकेत आहेत. त्यामुळे जे लोक गाडी पकडून देतील, त्यांना वाहन बक्षीस देईल का? याबाबत आपण पोर्टल करणार आहात का?, असे अनेक प्रश्न भाजप नेते आणि आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत विचारले होते. मुनगंटीवारांच्या या प्रश्नांवर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भूमिका मांडली. पुढील ८ दिवसांत राज्यात वाळू धोणार येणार आहे. त्यानुसार, अर्ज केल्यापासून १५ दिवसांत घरकुलधारकांना वाळू न मिळाल्यास तहसिलदारांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहितीही बावनकुळे यांनी दिली आहे.

पुढच्या ८ दिवसांत वाळू धोरण येणार आहे. आत्तापर्यंत २८५ सूचना त्यावर आल्या आहेत. त्यासाठी इतर राज्यातील वाळू धोरणांचा अभ्यास केला आहे. दगडांपासून केलेली वाळू मोठ्या प्रमाणात वापरायची आहे. त्याकरता क्रशर्संना उद्योगाचा दर्जा देऊन सबसिडी देणार येईल, अशी माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत उत्तरादाखल दिली. तसेच, घरकुलांना ५ ब्रास मोफत वाळू दिली जाईल, असेही त्यांनी म्हटले. भंडारा जिल्ह्यातील महसूल खात्यातील अधिकारी बेजबाबदार आणि निष्काळजीपणे वागत असल्याचाही प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावर, संपूर्ण अधिकाऱ्यांनी भंडारा जिल्ह्याची वाट लावली आहे, त्यांची विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करू असे आदेशच महसूल मंत्र्यांनी दिले आहेत. मुख्यमंत्र्यांसोबत बोलून गृह खात्याचीही चौकशी लावू. आता, पोलिसांनी थोडे चांगले काम केले आहे. ३ महिन्यात २५ कोटी रुपयांची वसुली केल्याची माहितीही बावनकुळे यांनी दिली.



१५ दिवसांत बाळू उपलब्ध करुन देणे बंधनकारक

वाळू धोरणानुसार १५ दिवसांत तहसीलदारांनी घरकुलांना वाळू उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेत आहोत. १५ दिवसांत वाळू उपलब्ध न केल्यास तहसीलदारांवर कारवाई केली जाईल. नव्या वाळू धोरणात हे नमूद असेल, तसेच तक्रारीसाठी निश्चितच एक पोर्टल तयार केले जाईल, अशीही माहिती बावनकुळे यांनी दिली. मागच्या काळात वाळूसाठी डेपोचे धोरण आले होते, शासनाने ते रद्द केले आहे. आता, पाटी धोरण आले आहे. संपूर्ण देशाचा अभ्यास करून धोरण तयार करत आहोत. पुढच्या ८ दिवसांत राज्याचे नवे वाळू धोरण येईल. ते अंतिम करण्याआधी आमदारांनी सूचना द्यावी, असेही बावनकुळे यांनी म्हटले.

# दारव्हा येथे अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषद द्वारा

## आयोजित जागतिक महिला दिना निमित्त नारीशक्ती सन्मान सोहळा व कोष्टी समाज मेळावा संपन्न

प्रतिनिधी । केज

दारव्हा येथे अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषद द्वारा जागतिक महीला दिनाच्या निमित्ताने नारी शक्ती सन्मान व कोष्टी समाज मेळावा संपन्न झाला. यावेळी कर्तृत्ववानमहिला हा पुरस्कार विद्याताई तारळकर यांना यवतमाळ दारव्हा येथे प्रदान करण्यात आला.जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अखित महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या वतीने कर्तृत्ववान महिला म्हणून सन्मान व गौरव करण्यात आला.यावेळी

प्रमुखउपस्थिती जगत्गुरु श्री श्री श्री दयानंदपुरी महास्वामीजी पिठाधिश, गायत्रीपीठ हम्पी हेमकुट, कर्नाटक हे होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये ना.संजयभाऊ राठोड मंत्री,मृद व जलसंधारण तथा पालकमंत्री यवतमाळ हे होते तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष व राष्ट्रीय अध्यक्ष,देवांग, देवांगण,कोष्टी,कोष्ठा फेडरेशनचे अध्यक्ष श्री.अरुणरावजी वरोडे, महिला प्रदेश अध्यक्ष सौ मंदाकिनीताई टकले, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. सतिशराव दाभाडे, श्री.पंडितराव विधाते, श्री.विष्णूभाऊ कुटे, अध्यक्ष सौ.शैलाताई लोळे,श्री.संजय दादा नवले,श्री.घटे सर,श्री. अशोक अलोने,कोष्टी समाजाचेबीडजिल्हाध्यक्ष श्री.सुरेशराव असलेकर, श्री.बाळासाहेब गलांडे, एसबीसी संघर्ष नेते श्री.बालाजी चिनके,श्री. बाळासाहेब दिवटे,श्रीमती मीरा वीर,मुख्य संयोजक श्री.सतिशराव सपाटे व कार्यक्रमास उपस्थित कोष्टी समाजातील राजकीय,सामजिकआणि विविध क्षेत्रातील लोक कार्यक्रमाला उपस्थित होते.यावेळी सत्काराला उत्तर देताना विद्याताई तारळकर यांनी सांगितले की,आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण जो नारिशक्ती म्हणून माझा सन्मानचिन्ह,शाल, श्रीफळ देऊन माझा यथोचीत सन्मान केला त्यामुळे आम्हाला सामाजिक,धार्मिक क्षेत्रात काम करण्यास आणखीन बळ व आगळी वेगळी ऊर्जा मिळाली आहे त्या बद्दल मी सर्वांना धन्यवाद देते.समाजाने पाठीशी कौतुकाने थाप दिली त्यामुळे माझी जबाबदारी वाढली आहे असे त्यांनी सांगितले.आभार प्रदर्शना नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.




# खंड पिठाच्या आदेशाची पायमल्ली,जिल्हा परिषद बीड आरोग्य विभागाचा गलथान कारभार

प्रतिनिधी । केज

बीड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाअंतर्गत ५० टक्के आरोग्य सेवक हंगामी फवारणी क्षेत्र पुरुष कर्मचारी यांच्या भरावयाच्या १०४ जागे साठी जिल्हा परिषदेच्या वतीने वर्तमान पत्रात जाहिरात देणे,परीक्षा घेणे,गुणवत्ता यादी जाहीर करणे,कागद पत्राची पडताळणी करणे अशी प्रक्रिया सप्टेंबर २०२४ अखेर पूर्ण होऊनही पात्र आरोग्य कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्यात आली नव्हती.त्यामुळे या प्रकरणी औरंगाबाद खंड पिठात सुनावणी होऊन हे पद आरोग्याशी निगडित असल्याने तात्काळ कार्यवाही करावी असा आदेश दहा दिवसापूर्वी बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्यजीवणे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांना देऊनही १०४ आरोग्य कर्मचाऱ्या च्या नियुक्तीच्या अध्याप ही हालचाली सुरु करण्यात आलेल्या नाहीत.पात्र आरोग्य कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्यात यावेत अशी मागणी निवड झालेल्या आरोग्य सेवक कर्मचाऱ्या कडुन होत आहे.या भरती प्रक्रियेचा निकाल सहा महिन्यापूर्वी लागूनही आणि औरंगाबाद खंडपिठाणे दि.७ मार्च २०२५ रोजी बीड येथील मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना आदेश देऊनही व ग्राम विकास विभागाच्या अवर सचिव सुप्रिया घोटाळे यांनी दि.१२ मार्च २०२५ रोजी आवश्यक कारवाई करावी असे आदेश संबंधितांना दिलेले आहेत.तरीही या प्रकरणी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारीअधिकारी आदित्य जीवणे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांनी ५० टक्के आरोग्य सेवक कर्मचाऱ्यांना नियुक्तीचे आदेश दिलेले नाहीत.हे आदेश पात्र कर्मचाऱ्यांना तात्काळ देण्यात यावेत अशी मागणी निवड झालेल्या कर्मचाऱ्यांतुन होत आहे.

पात्र कर्मचारी मानसिक व आर्थिक विवंचनेत

बीड जिल्ह्यातून ५० टक्के आरोग्य सेवक कर्मचारी पदासाठी पात्र ठरलेले १०४ आरोग्य कर्मचारी यांनी निवडसात महिन्यापूर्वी होऊनही त्यांना अद्याप नियुक्तीचे आदेश मिळालेले नाहीत. त्यामुळे हे सर्वजण मानसिक व आर्थिक विवंचनेत सापडलेआहेत.

सत्यता पडताळणीहोताच नियुक्ती देणार

या प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांचेशी संपर्क साधला असता पात्र आरोग्य कर्मचाऱ्यां च्या फवारणी प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी होणे बाकी आहे.ही पडताळणी पूर्ण होताच पुढीलआठवड्यात पात्र आरोग्यकर्मचाऱ्यांना नियुक्तीचे आदेश देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनीप्रतिनिधीशी बोलताना दिली.

# बीड रेल्वे जंक्शनसाठी खा.सोनवणेंची तळमळ; नव्या रेल्वेमार्गासाठी २ हजार कोटींची मागणी

## लोकसभा सभागृहात खा.सोनवणेंची अभ्यासपुर्ण मांडणी, रेल्वेबाबतच्या मुद्देसूद मांडणीचे कौतूक, सततच्या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद

बीड / प्रतिनिधी

अहिल्यानगर-परळी रेल्वेमार्गाचे काम गतीने सुरू आहे. तर उस्मानाबाद (धाराशिव)-बीड-औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) हा महत्वाचा रेल्वेमार्ग अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी देण्यात आला असून, या कामाला गती देण्यासाठी दोन हजार कोटींची आर्थिक तरतूद करावी, अशी तळमळीने अभ्यासपुर्ण मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी आज रेल्वे बजेटवर बोलताना केली.

दिल्ली येथे लोकसभेचे अधिवेशन सुरू असून दि.१७ मार्च रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वेबजेट वर बोलताना आभ्यासपूर्ण व मुद्देसूद मांडणी केली. यावेळी ते म्हणाले,बीड जिल्हा हा अजूनही रेल्वेसेवेपासून वंचित राहिलेला एक मोठा जिल्हा आहे. सततच्या मागणीला प्रतिसाद देत उस्मानाबाद (धाराशिव)-बीड-औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) हा महत्वाचा रेल्वेमार्ग अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी देण्यात आला असून, या कामाला गती देण्याची गरज आहे. या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा करत असताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी या रेल्वेमार्गाच्या अंतिम स्थान सर्वेक्षणास मान्यता देत सहा कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करुन या खासदारांच्या महत्वाकांक्षी प्रकल्पास प्रतिसाद दिलेला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास दक्षिण भारतातील कन्याकुमारी, चेन्नई, हैदराबाद, तिरुपती या महत्वाच्या शहरांना उत्तर भारतातील दिल्ली, अयोध्या, काशी तसेच श्रीनगरपर्यंत जोडणारा सर्वात कमी अंतराचा आणि वेळ आणि खर्च वाचविणारा महत्वाचा वर्दळीचा मार्ग ठरेल. हा प्रकल्प मराठवाड्यातील, विशेषत: बीड जिल्ह्याच्या नागरिकांसाठी विकासाचा राजमार्ग ठरेल. यामुळे औद्योगिक विकास, व्यापार, रोजगार आणि शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतील.

उस्मानाबाद-बीड- औरंगाबाद रेल्वे प्रकल्पासाठी सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पामधे किमान २००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी, याचबरोबर, या रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण युद्धपातळीवर पूर्ण करून, पंतप्रधान व रेल्वेमंत्री यांच्या हस्ते याच काळात उद्घाटन व्हावे आणि काम तातडीने सुरू व्हावे. उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद रेल्वेमार्गाच्या अंतिम स्थान सर्वेक्षणानंतर, या मार्गाच्या बांधकाम व देखभालीसाठी उपमुख्य अभियंता (कन्स्ट्रक्शन) यांचे कार्यालय बीड जिल्ह्यामधे करण्यास मान्यता देण्यात यावी, आहिल्यानगर-बीड-परळी या रेल्वेमार्गावर बीडसाठी तयार करण्यात आलेले रेल्वे स्थानक हे शहरापासून १५ किलोमीटर अंतरावर आहे. प्रवाशांची होणारी अडचण लक्षात घेता या मार्गावर बीड शहरात बार्शी नाका येथे एक स्थानक बांधकाम करुन तेथेही सर्व गाड्यांना थांबा देण्यासाठी तरतूद प्राधान्याने करण्यात यावी, अशी मागणी केली.

यासाठीही निधीची मागणी

१) अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामामुळे काकडवाडी, धानोरा रोड, हिवरसिंगा, चऱ्हाटा आणि इतर ठिकाणी सडक वाहतूक बाधित झाली आहे. त्यामुळे शेतकरी, शालेय विद्यार्थी, वृद्ध आणि प्रवाशांना अडचणी येत आहेत. यासाठी या ठिकाणी तसेच बीड-परळी मार्गावरील आवश्यक ठिकाणी पुल बांधण्याची आवश्यकता आहे. या कामांसाठी आवश्यक ती तरतूद करण्यात यावी.

२) पाटोदा तालुक्यातील कारेगाव ते शिरुर तालुक्यातील मोरजळवाडी (जाटनांदूर) या रेल मार्गावर रेल्वे पूल बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. अहमदनगर - बीड मार्गावर प्रवासी ट्रायल रन यशस्वी झाल्यामुळे, बीड ते मुंबई अशी नियमित रेल्वे सेवा सुरु करावी अशी आग्रही मागणी केली.

रेल्वे प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषत: तिकीट बुकिंग, कन्फरमेशन व रेल्वे ट्रॅकिंग या सुविधांमध्ये सुधारणा होण्याची गरज आहे.

या उपाययोजनांची गरज

१. टिकिट बुकिंगमध्ये सुलभता येण्यासाठी ऑनलाइन बुकिंग सोपे व सुटसुटीत करावे.

२. प्रवाशांच्या मोबाईल फोनवर तिकीट कन्फरमेशनची माहिती तत्काळ पाठवण्याचे तंत्रज्ञान लागू करावे.

३. रेल्वे ट्रॅकिंग सेवा: प्रवाशांच्या मोबाईल क्रमांकावर त्यांची गाडी वेळेवर आहे का याची माहिती दिली जावी.

आवश्यक सुधारणाही मांडल्या

- अपघात टाळण्यासाठी अत्याधुनिक सिग्नल प्रणाली बसविणे.
- मानवविरहित फाटकांऐवजी संपूर्ण स्वयंचलित फाटकांची व्यवस्था करणे.
- प्रमुख स्थानकांवर तसेच गाड्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि आपत्कालीन अलार्म बटण बसविणे.
- रेल्वे सुरक्षा पथकांची तैनाती करुन संवेदनशील भागांमध्ये अधिक गस्त वाढवणे.
- रात्रीच्या वेळी धावणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना पुरेशी सुरक्षा देणे.
- प्रत्येक स्थानकावर आधुनिक शौचालये, स्वच्छता कर्मचारी आणि स्वयंचलित सफाई यंत्रणा बसवणे.
- प्रत्येक डब्यात स्वच्छ पाण्याची व्यवस्था आणि वैद्यकीय सहाय्य केंद्रे उपलब्ध करणे.
- डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर: मालवाहतूक व प्रवासी वाहतूक वेगवेगळ्या मार्गावरून चालविणे, यामुळे प्रवासी गाड्यांचा वेग वाढेल.

# तृप्ती देसाई यांनी देशमुख कुटुंबीयांची सांत्वन पर घेतली भेट

**स्व. संतोष देशमुख यांचे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना लवकरात लवकर फाशी द्या-तृप्ती देसाई**



अनंत जाधव /मस्साजोग

मस्साजोगचे सरपंच स्व .संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाला तीन महिने उलटून गेले तरीही बीड पोलिसांना एक आरोपी सापडत नाही.मात्र आज सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी दि.१७ सोमवार रोजी मस्साजोगला जात देशमुख कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली आणि देशमुख कुटुंबीयांशी संबंधित प्रकरणाची चौकशी केली. याप्रसंगी तृप्ती देसाई प्रसार माध्यमांशी संवाद साधतांना म्हणाल्या स्व.संतोष देशमुख यांच्या परिवारातील सर्वच सदस्यांची भेट घेतली आणि त्यांच्याशी चर्चा केली गावकरी इथं होते सगळयांचे एकच मत आहे .आता सगळी चौकशी झालीय जे आरोपीत अटकेत आहेत एक आरोपी फरार आहे .परंतु तातडीने त्यांना न्याय मिळाला पाहिजे .या प्रकरणातील जे कोणी आरोपी आहेत त्यांना लवकरात लवकर शिक्षा झाली पाहिजे .आई तर मला सांगितले जसं माझ्या मुलाला तडफडून मारले तसं जे आहे कायद्यानुसार माझ्या समोर या आरोपीना तडफडून मारलं पाहिजे .कारण राज्या मध्ये आशा क्रुर पध्दतीने हत्या होतात त्या मिटवल्या जातात ,लपवल्या जातात गुंडगिरीच्या नावावर सत्येच्या माजावर ,पैशांच्या माजावर अनेक घटना याच्या आधी झाल्या आहेत हे प्रकरण कुटूबियांनी गावकर्यांनी राज्यातील सर्व लोकांनी उचलून धरलं आणि मिडीयांने ही सत्य परिस्थिति समोर आणली

म्हणून आता इथं पर्यंत हे प्रकरण आलेल आहे. मला वाटतं की फास्ट्रॅक कोर्टामधे अनेक केसेस जातात परंतु वर्षानुवर्षे त्यात सुध्दा न्याय मिळत नाही लवकरात लवकर न्याय मिळाला पाहिजे आणि आरोपींना फाशी झाली पाहिजे.कृष्णा आंधळे फरार आहे .मध्यंतरी नाशिकला होता तेव्हा ही अनेक चर्चा सुरु होत्या परंतू मध्यंतरी मला एक फोन आला होता त्यांनी मला सांगितले की तो महाराष्ट्र आणि कर्नाटक बॉडरीवर तृतीय पंथीच्या वेशात असू शकतो आणि त्यांनी मला हेही सांगितलं की जेव्हा बीड जिल्ह्यामध्ये अनेक तृतीयपंथी होते ,त्यांच्याशी त्यांचे चांगले संबध होते. त्यामुळे निश्चितच तृतीयपंथ्यांबरोबर एखाद्या वस्तीमधे तृतीयपंथ्यांचं वेशधारण करून तो तिथे असू शकतो असं ते पोलिसांना सांगावे असा मला फोन आला होता त्यामध्ये कितपत तथ्य आहे .किंवा नाही त्यामुळे तातडीने त्यासंदर्भात मी कोणांशी बोलले नव्हते.वाल्मिक कराड १५ आणि १६ डिसेंबरला दिंडोरीचं जे गुरूपीठ आहे अण्णा मोरेचं त्या गुरूपीठामध्ये वाल्मिक कराड मुक्कामाला होता

# माजलगाव गेवराई रोडवर अज्ञात वाहनाची जोरात स्कुटीला धडक दोघांचा मृत्यू

माजलगाव / प्रतिनिधी

माजलगाव - गेवराई हायवेवर असलेल्या व्यंकटेश मंगल कार्यालयाजवळ चहा पिवुन माजलगावकडे येत असलेल्या स्कुटीला पाठीमागुन अज्ञात वाहनाने दिलेल्या जोराच्या धडकेत दोघांचा मृत्यु झाल्याची घटना दि. १६ रविवारी रात्री घडली आहे.शहरातील मस्के हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेले डॉ. शरद नवनाथ चव्हाण रा. जायकोवाडी तांडा आणि स्वरूप मस्के हे दोघे रात्री गेवराई रोडवर चहा पिण्यासाठी गेले असता चहा पिवुन परत येत असतांना व्यंकटेश मंगल कार्यालया जवळ पाठीमागुन एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने या आपघातात स्वरूप मस्के हा जागीच ठार झाला तर डॉ. शरद चव्हाण हे उपचारासाठी घेवुन जात असतांना त्यांचाही मृत्यु झाल्याची -हदयद्रावक घटना घडली आहे. सदरील आपघात इतका भयानक होता की धडक दिलेली स्कुटी दिडशे ते दोनशे फुट उडुन रस्त्याच्या बाजुला फरफटत नेलेली दिसत



आहे. डॉ. शरद चव्हाण यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार. या आपघाताने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. या आपघातप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता.

# परळीतील अवैध धंद्यांवर पोलिसांची आता करडी नजर

**एमआरडी, तंबाखूजन्य पदार्थ ,गुटखा असा ६,७३,३६०/- चा माल आरोपीसह ताब्यात**

बीड प्रतिनिधी

परळी शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये आज रोजी पोलीस स्टाफ पेट्रोलिंग करत असताना, गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की एक इसम स्विफ्ट डिझायर गाडीमध्ये गुटखा विक्रीसाठी घेऊन परळी मध्ये येणार आहे. मिळालेल्या माहितीवरून सदर वाहनाचा शोध घेता, संशयितरित्या एक स्विफ्ट डिझायर गाडी दिसून आली. सदर गाडीची दोन पंचा समक्ष झडती घेता सदर गाडीमध्ये पांढरे गोण्यात गुटख्या सारखा माल दिसून आल्याने सदर वाहन पोलीस ठाणे येथे आणून पंचा समक्ष वाहनाची झडती घेता सदर गाडीमध्ये पांढऱ्या गोन्या भरलेला एम आर डी व तंबाखूजन्य पदार्थ ,गुटखा असा एकूण एक १,२३ ३६० रुपयाचा मुद्देमाल व स्विफ्ट डिझायर गाडी ५,५०,०००/- असा एकूण ६,७३,३६०/- रू चा माल आरोपी नामे -- गजानन नारायण मनाळे , रा. जलालपुर याचे ताब्यात मिळून आलेला आहे.

# शासन, प्रशासन आणि संस्थाचालकांच्या शिक्षक आणि शिक्षण

## विरोधी धोरणाने घेतला धनंजय नागरगोजे सरांचा बळी !

**दोषींवर कडक कारवाई करा व सर्व विनाअनुदानित, अंशत: अनुदानित शाळांना अनुदान देऊन शिक्षकांची वेठबिगारी संपवा- मराठवाडा शिक्षक संघाची मागणी**

बीड / प्रतिनिधी

अठरा वर्षे विनावेतन काम करणाऱ्या शिक्षकांने इतक्या दीर्घ काळापासून वेतन नसल्याने मी हतबल झालो आहे, काय करू असे संस्थाचालकास विचारले असता फाशी घेण्याचा सल्ला त्यांनी दिला. त्यामुळे निराशेच्या प्रचंड गर्तेत सापडलेल्या धनंजय नागरगोजे नावाच्या शिक्षकाने फेसबुक पोस्ट करून आपल्या 'चिमुकल्या मुलीची' माफी मागून गळफास घेऊन आपली जीवन यात्रा संपविली. मृत्यूस जबाबदार असलेल्या लोकांची यादी त्यांनी फेसबुक पोस्ट मधून दिली आहे. शासन, प्रशासन आणि संस्थाचालकांनी घेतलेला हा बळी असून संस्थाचालक व शासनावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी केली आहे.



मराठवाडा शिक्षक संघाने याबाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, दिवंगत शिक्षक धनंजय नागरगोजे यांची फेसबुक पोस्ट हृदय पिळवटून टाकणारी आहे. विनाअनुदान धोरण हा पुरोगामी महाराष्ट्राला लागलेला कलंक आहे. धनंजय नागरगोजे अठरा वर्षांपासून विनावेतन काम करीत होते. वेतन नसल्याने आपले आई वडील पत्नी मुले यांच्या ईच्छा पूर्ण करू शकत नसल्याची भावना त्यांच्या मनामधे निर्माण झाली होती. महाराष्ट्रात पाव शतकांपासून सुमारे पासष्ट हजार शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विनावेतन वा अंशत: वेतनावर राबवून घेतले जात आहेत. याच लोकांच्या जीवावर देश महासत्ता बनणार आहे. परंतु सुमारे पाव शतकांपासून हे लोक कसे जगत असतील? आपला संसार कसा चालवित असतील याचा जराही विचार ना देशातील राज्यकर्ते करताहेत ना संस्थाचालक ना प्रशासन! यांना जराही लाज कशी वाटत नाही असा प्रश्न उपस्थित करून हाच का तो शिव फुले-शाहू-आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र असा संतप्त सवाल विचारला आहे. दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, सर्व विनाअनुदानित, अंशत: अनुदानित शाळांना शंभर टक्के अनुदान देऊन शिक्षकांची वेठबिगारी संपवावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव,सरचिटणीस राजकुमार कदम,कोषाध्यक्ष औताडे ए. बी., उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे,केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अशोक मस्कले,बंडू अघाव,जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, जिल्हा सचिव गणेश आजबे,नागनाथ तोंडारे,परवेज देशमुख, विजय गणगे,व्यंकटराव धायगुडे, नामदेव काळे, सुभाष सेवाळे,हनुमंत घाडगे, अनुप कुसूमकर, श्रीधर गुट्टे,संजय गोरे, अलिशान काजी आदिंनी केली आहे.

# बीड जिल्हा पत्रकार संघाची पाटोदा तालुका कार्यकारणी जाहीर

प्रतिनिधी । पाटोदा

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या बीड जिल्हा पत्रकार संघाच्या पाटोदा तालुका कार्यकारिणीची निवडी जाहीर करण्यात आल्या असून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व राज्य समन्वयक संतोष मानूरकर जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे शेख रिजवान पाटोदा पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार संघाचे पाटोदा तालुका अध्यक्ष ड. महेश बेदरे यांनी या निवडी जाहीर केल्या आहेत.

या निवडी मध्ये बीड जिल्हा पत्रकार संघाच्या पाटोदा पत्रकार संघ सचिव पदी पत्रकार आमीर शेख यांची निवड करण्यात आली आहे तर पाटोदा शहराध्यक्ष म्हणून पत्रकार सुधीर एकबोटे यांची निवड करण्यात आली आहे त्याचप्रमाणे पत्रकार संघाच्या तालुका उपाध्यक्षपदी चंद्रशेखर पवार अमळनेर विभाग तसेच पाटोदा विभागाच्या उपाध्यक्षपदी पत्रकार सय्यद रियाज यांची निवड झाली आहे तसेच संघटक म्हणून शेख महेशर तर सहसचिव म्हणून छायाचित्रकार राहुल सोनवणे यांच्या निवडी जाहीर करण्यात आलेल्या आहेत या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे आणि जिल्हाध्यक्ष शेख रिझवान यांच्यासह मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत थोर भौतिक शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन यांची जयंती साजरी

प्रतिनिधी । केज

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी या शाळेत सैद्धांतिक भौतिकशास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन केले व जयंती साजरी करण्यात आली.जिल्हा परिषदउच्च प्राथमिक शाळा तरनळी या शाळेचे मुख्याध्यापक श्री.राजाभाऊ कदम यांनी प्रास्ताविक केले.या थोर शास्त्रज्ञाचा जन्म जर्मनी या देशात दि.१४ मार्च १८७९रोजी झाला.अल्बर्ट आइनस्टाइन हे सैद्धांतिक भौतिकशास्त्रज्ञ होते.ते सापेक्षतेचा सिध्दांत विकसित करण्यासाठी प्रसिद्ध होते.असेआपल्या प्रास्ताविकात मुख्याध्यापक राजाभाऊ कदम यांनी सांगितले. शाळेतील शिक्षिका व शिक्षकांनी या शास्त्रज्ञा बाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भारत हांगे यांनी केले व श्रीमती सोनाली भुमकर यांनी आभार मानले. शास्त्रज्ञांची जयंती साजरी करुन विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी केल्या जातात.विविध प्रयोगातून विज्ञानाची माहितीदेण्यात आली.





# इफ्तारसाठी घराकडे निघाले,पण भरधाव वेगाने घात केला

प्रतिनिधी । नांदेड

नागपूर महामार्गावरील पिंपळगाव पाटीजवळ शनिवारी सायंकाळी थरकाप उडवणारा अपघात घडला आहे.भरधाव वेगातील स्कार्पिओ गाडीने एका पादचाऱ्याला उडवले आहे. त्यानंतर अनियंत्रित झालेली स्कार्पिओ गाडी पलटी होऊन आणि दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकला जोरदार धडकली.यामध्ये दोघांनी जीव गमवावा लागला आहे.

नांदेड-नागपूर महामार्गावरील पिंपळगाव पाटीजवळ शनिवारी सायंकाळी थरकाप उडवणारा अपघात घडला आहे.भरधाव वेगातील स्कार्पिओ गाडीने एका पादचाऱ्याला उडवले आहे. त्यानंतर अनियंत्रित झालेली स्कार्पिओ गाडी पलटी होऊन आणि दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकला जोरदार धडकली.हा अपघात एवढा भीषण होता की घटनेनंतर दोघांचा मृत्यू झाला आहे.तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे.अर्धापूरहून नांदेडच्या दिशेने स्कॉर्पिओ गाडी भरधाव वेगाने जात होती. या गाडीत सहा जण होते.पिंपळगाव पाटी जवळ रस्ता ओलांडून जात असलेल्या एका व्यक्तीला स्कॉर्पिओने धडक दिली.त्यानंतर वाहन चालकाचे वाहनावरून नियंत्रण सुटले आणि गाडी पलटी होऊन डिव्हाईडरला ओलांडून विरुद्ध दिशेला गेला आणि नांदेडहून अर्धापूरकडे




जाणाऱ्या ट्रकवर आदळली. हा अपघात एवढा भीषण होता की,अपघातानंतर गाडीमध्ये असलेले सहाही जण गाडीखाली दबले गेले.स्थानिक नागरिकांनी धाव घेत जखमींना बाहेर काढले.रुग्णवाहिकेने त्यांना तात्काळ नांदेडच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले.

या अपघाताता सय्यद हुजैफ (वय ३२) आणि शेख सलाम (वय ३०) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. दोघेही रहिवासी नांदेड शहरातील पाकीजा नगर येथील रहिवासी होते. तर शेख मस्तान शेख झैनुद्दीन (वय ३०,साई नगर, नांदेड),सय्यद एजाज सय्यद ग़ौस (वय २५),सय्यद फ़ज़ल सय्यद ग़ौस (वय २७), नौमान खान हबीब खान (वय २०), शेख रिजवान शेख अलीम (वय २२),शंकर बोडके (पिंपळगाव, नांदेड) आदी जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने नांदेडच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे.दरम्यान अपघातग्रस्त मुस्लीम असून ते इफ्तारीसाठी नांदेडमध्ये आपल्या स्वगृही परतत होते. पण त्यांच्यावर वाटेतच काळाचा घाला पडला आहे. अपघातानंतर घटनास्थळी गोंधळ उडाला होता,त्यामुळे काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती.रमजान महिन्यात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.मृत तरुणांच्या कुटुंबीयावर आभाळ कोसळले आहे.या मार्गावर यापूर्वी देखील अनेक अपघात घडले आहे. वेगाने वाहन चालवणाच्या नादात अपघाताला बळी पडत आहेत.

# बरं झालं पक्ष फुटला, सुप्रिया सुळे यांचं पहिल्यांदाच मोठं विधान

**नाव न घेता धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल**



पुणे /प्रतिनिधी

**शरद पवार गटाच्या नेत्या, खासदार सुप्रिया सुळे यांनी पहिल्यांदाच राष्ट्रवादीच्या फुटीवर थेट आणि मोठं विधान केलं आहे. बरं झालं पक्ष फुटला, असं विधान सुप्रिया सुळे यांनी केलं आहे. तसेच त्यांनी राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे यांचं नाव न घेता त्यांच्यावरही जोरदार हल्लाबोल केला आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीच्या आढावा बैठकीत सुप्रिया सुळे यांनी हे विधान केलं आहे. त्यामुळे सुप्रिया सुळे यांच्या विधानाची जोरदार चर्चा रंगली आहे.**

शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीची आढावा बैठक पार पडली. या बैठकीतील खासदार सुप्रिया सुळे यांची एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. त्यात त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. तसेच पक्ष फुटला हे बरं झाल्याचं मोठं विधानही त्यांनी केलं आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.या बैठकीची एक ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे. त्यात सुप्रिया सुळे यांनी हे विधान केलं आहे. मला कधी कधी



वाटतं बरं झालं पक्ष फुटला. ते या पक्षात असते आणि मी या पक्षात असते तर एक तर ते तरी राहिले असते किंवा मी तरी राहिले असते. मी त्या पक्षात काम करू शकत नाही. . सगळया दुनियेला माहीत आहे. माझी लढाई त्यांच्याबरोबर ते पक्षात असतानाही होती. मी हे कधी बाहेर बोलले नाही, पण संघटनेत आहे म्हणून बोलते, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे यांचं नाव न घेता जोरदार निशाणा साधला. जो पुरुष स्वत:ची जी बायको, जी आपल्या मुलांची आई आहे, तिच्या गाडीत बंदूक ठेवू शकतो अशा पुरुषाबरोबर एक तर तो पुरुष नाहीच आणि त्याच्याबरोबर मी काम करू शकणार नाही. तेव्हापासून लढाई सुरु झाली. मी आज पहिल्यांदाच ही गोष्ट बोलले. मी माईकवरही बोलेल. मी नाही कुणाला घाबरणार. मी असली फालतू लढाई करत नाही. मी विरोधी पक्षात आयुष्य घालवेल, पण नैतिकता सोडणार नाही. मला नकोय ते कंत्राटदाराचे पैसे. माझं घर काही त्या कॉन्ट्रॅक्टरच्या पैशावर चालत नाही, असा हल्लाच त्यांनी चढवला. संतोष भाऊच्या आईला भेटा, बायकोला भेटा. महादेव मुंडेंच्या बायकोला भेटा. काय चूक केली त्यांनी? त्यांच्याकडे मुलांना लेकरं म्हणतात. आपण मुलं म्हणतो. महादेव मुंडेंची बायको विचारते, माझ्या लेकरांची चूक काय उत्तर द्या? काय उत्तर देणार? आणि मग जेव्हा संतोष भाऊच्या घरी गेले. त्यांच्या आईने माझा हात धरला. म्हणाल्या, तू मला न्याय देणार का? शब्द दे सुप्रिया तू मला न्याय देशील, असंही त्या म्हणाल्या.